फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

गडचिरोली जिल्हा

२०००–२००१

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन
मुंबई.

फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2000-2001 जिल्हा-गडचिरोली

जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन,
गडचिरोली

एक

अनुक्रमणिका

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2000-2001

जिल्हा - गडचिरोली

अ. क्र.	तक्ता क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
1	2	3	4
		भाग - 1	
1	-	दुष्टीक्षेपात जिल्हा व राज्य	I ते VII
		भाग - 2	
1	-	बाबी / समालोचन गडचिरोली जिल्हा	एक ते एकोणवीस
		भाग - 3	
		1. क्षेत्रफळ व लोकसंख्या	
1	1.1	जनगणने नुसार तालुकावार क्षेत्रफळ, घरे व लोकसंख्या	1
2	1.2	1951 पासुनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक वाढ	3
3	1.3	1991 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या गटानुसार गावांचे तालुकावार वर्गीकरण	9
4	1.4	2001 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या गटानुसार शहरांचे तालुकावार वर्गीकरण	11
5	1.5(अ)	1991 च्या जनगणनेप्रमाणे काम करणारे व काम् न करणा-यांची संख्या	13
6	1.5(ब)	1991 च्या जनगणनेनुसार मुख्यत: काम करणा-या व्यक्तींचे उद्योग गट क्षेत्रनिहाय विभागणी	17
7	1.6(अ)	लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण 1981	18
8	1.6(ब)	लोकसंख्येचे धर्मानुसार वर्गीकरण 1981	19
9	1.7	1991 च्या जनगणनेनुसार अनुसुचित जाती व जमाती करीता आकडेवारी	20
10	1.8	भिंती/छप्परे यासाठी वापरलेल्या साधन सामग्री नुसार घरांचे वर्गीकरण 1991	22
11	1.9	आकार व मालकीच्या स्थिती नुसार ग्रामीण/नागरी क्षेत्रातील कुटूंबांचे वर्गीकरण, जनगणना 1991	23
12	1.10	जनगणना घरे आणि त्यांचा वापर, जनगणना 1991	24
13.	1.11	क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न, चालू किंमतीनुसार	25
14	1.12	क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न, स्थिर किंमतीनुसार (1993-94)	26
		2. हवामान	
15	2.1	निवडक केंद्रातील पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य, 2000	27
16	2.2	निवडक केंद्रातील कमाल व किमाण तापमाण, 1998	32

पुढे चालू..

1	2	3	4
		3. कृषी	
17	3.1	जमिनीचा वापर सन 1996-97,1997-98 व 1999-2000 या वर्षाकरीता	33
18	3.2	तहसिलवार निरनिराळ्या पिकाखालील क्षेत्र(1996-97,97-98 व 99-2000)	37
19	3.3	मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन व एकूण उत्पादन (2000-01)	53
20	3.4	विविध साधनांनी ओलीताखालील असलेल तालुकावार क्षेत्र (1996-97 ते 1999-2000)	54
21	3.5	निरनिराळ्या पिकाखालील ओलीताचे तालुकावार क्षेत्र सन 1996-97 ते 1999-2000 वर्षाकरीता	56
22	3.6(अ)	तालुकावार सिंचन विहीरी आणि इतर विहीरी 1996-97 ते 1999-2000	66
23	3.6(ब)	तालुकावार कुपनलीका, हातपंप व विद्युत पंप 2000-01	68
24	3.7	लघु पाटबंधा-यांची कामे	69
25	3.8	मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पामूळे भिजनारे क्षेत्र व मिळणारे फायदे जून-01	71
26	3.9	वहितधारण जमिनीची संख्या व त्याचे क्षेत्रफळ, ओलीताखाली असलेली वहित धारण जमिन आणि ओलीताखालील निव्वळ क्षेत्र व वहितीच्या व प्रकारानुसार क्षेत्रफळ श्रेणीनुसार वहितधारण जमिनीची संख्या (1990-91)	74
27	3.10	कृषी विषयक अवजारे पशुगणना, 1997	78
28	3.11	दुष्काळ, टंचाई व टंचाई सदृश्य परिस्थितीची माहिती 2000-01	79
29	3.12	टंचाईच्या पुर्वेतिहासानुसार कठीन व इतर टंचाईग्रस्त भाग ठरविण्याबाबत माहिती 2000-01	82
		4. पशुसंवर्धन	
30	4.1	तहसिलवार पशुधंन (1997 च्या पशुगणनेनुसार)	83
31	4.2	जिल्हयातील पशुवैद्यकीय संस्थांची तहसिलनिहाय संख्या 2000-01	90
32	4.3	रोगांच्या प्रकारानुसार पशुंच्या मृत्युंची संख्या 2000-01	93
33	4.3(अ)	विविध पशुवैद्यकीय संस्थांचे कार्य, 2000-01	94
34	4.4	मान्यताप्राप्त पशुवधगृहे आणि प्रत्यक पशुवधगृहात कत्तल केलेल्या पशुची संख्या	95
35	4.5	जिल्हयातील वनक्षेत्र 2000-01	96
36	4.6	जिल्हयातील मुख्य व गौन वन उतपादने 2000-01	97
37	4.7	जिल्हयातील भुजल मत्स्यव्यवसाय वर्ष 2000-01	98
38	4.8	जिल्हयातील सागरी मत्स्यव्यवसाय वर्ष 2000-01	**

पुढे चालु...

1	2	3	4
		5. रोजगार उद्योग, खनिकर्म व वीज	
39	5.1	कारखाण्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या वर्ष 2000	99
40	5.2	चालु कारखाण्यांचे व कामगाराच्या संख्येनुसार उद्योगनिहाय वर्गीकरण वर्ष 2000	101
41	5.3	कामाच्या दिवसांच्या संख्येनुसार कारखाण्यांचे वर्गीकरण वर्ष 2000	105
42	5.4	उद्योगाचा महत्वाच्या बाबींच्या तपशिल (वार्षिक उद्योग पाहणी) वर्ष 1996-97	109
43	5.5	रोजगार विनीमय केंद्रातील आकडेवारी वर्ष 2000	113
44	5.6	व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम वर्ष 2000-01	115
45	5.7	जिल्ह्यातील कर्मचा-यांची संख्या (कर्मचारी गणना-2000)	116
46	5.8	निरनिराळ्या उद्योगातील रोजगार (31 मार्च, 2001 ला संपणा-या वर्षाकरीता)	117
47	5.9	विद्युतीकरण झालेल्या शहरांची व गावांची संख्या व त्यांची लोकसंख्या 01 अखेर	118
48	5.10	विजेचा वापर 2000-01 या वर्षाकरीता	119
49	5.11	कृषी व बीगरकृषी उद्योग (आर्थिक गणना 1998)	120
50	5.12	प्रमुख उद्योग गटानुसार उद्योगांची संख्या आणि सर्व साधारण पणे नेहमी काम करणा-या कामगारांची संख्या (आर्थिक गणना 1998)	121
51	5.13	महत्वाचा उद्योग गआनुसार कृषी व बीगरकृषी आस्थापनांची संख्या (आर्थिक गणना 1998)	122
52	5.14	महत्वाचा उद्योग गआनुसार कृषी व बीगरकृषी आस्थापनांतील कामगारांची संख्या. (आर्थिक गणना 1998)	123
53	5.15	बीगरकृषी आस्थापना (सर्व उद्योग गट एकत्र)(आर्थिक गणना 1998)	124
54	5.16	उद्योग गटानुसार सहकारी औद्योगीक संस्था व रोजगार यांची संख्या (आर्थिक गणना 1998)	125
55	5.17(अ)	वस्तू निर्माण व दुरुस्ती सेवा या गटातील स्वकार्यरत उद्योगाची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	126
56	5.17(ब)	वस्तू निर्माण व दुरुस्ती सेवा या गटातील आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	127
57	5.18(अ)	घाऊक व किरकोळ व्यापारामधील स्वकार्यरत उद्योगांची संख्या व नेहमी काम करणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	128

पुढे चालू...

1	2	3	4
58	5.18(ब)	घाऊक व किरकोळ व्यापर उद्योग गटातील आस्थापनाची एकूण संख्या व नेहमी कामकरणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	129
59	5.19(अ)	सामुहीक,सामाजिक व व्यक्तीगत सेवा मधील एकूण स्वकार्यरत उद्योगांची संख्या व नेहमी कामकरणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	130
60	5.19(ब)	सामुहीक, सामाजीक व व्यक्तीगत सेवा मधील आस्थापनेची एकूण संख्या व नेहमी कामकरणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	131
61	5.20(अ)	सर्व उद्योगटातील स्वकार्यरत उद्योगांची संख्या व नेहमी कामकरणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	132
62	5.20(ब)	सर्व उद्योग गटमिळून एकत्र उद्योग गटातील आस्थापनांची एकूण संख्या व नेहमी कामकरणा-या कर्मचा-यांची आकारमान गटानुसार संख्या (आर्थिक गणना 1998)	133
		6 सहकार	
63	6.1	विविध प्रकारच्या सहकारी संस्था 31/3/2001 अखेर	134
64	6.2	जिल्हयातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाची माहीती 31/3/01ला संपणा-यां वर्षाकरीता	135
65	6.3	जिल्हयातील सहकारी संस्थाची लेखा परीक्षण वर्गा प्रमाणे वर्गवारी 31/3/01 अखेर	136
66	6.4	जिल्हयातील राज्य आणि जिल्हा पातळीवरील सहकारी बँकेची कार्ये 31/3/01अखेर	137
67	6.5	जिल्हयातील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांचे कार्य 31/3/01 अखेर	138
68	6.6	जिल्हयातील शेतकरी सेवा संस्थाचे कार्य 31/3/01 अखेर	**
69	6.7	जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थाचे कार्य 31/3/01 अखेर	141
70	6.8	जिल्हयातील प्राथमिक कृषि सहकारी संस्थांनी दिलेली पिक कर्जे 31/3/01 अखेर	144
71	6.9	जिल्हयातील शेतकरी सेवा संस्थानी दिलेली पिक कर्जे 31/3/01 अखेर	**
72	6.10	जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थानी दिलेली पिक कर्जे 31/3/01 अखेर	145
73	6.11	जिल्हयातील बिगर कृषि सहकारी पत संस्थांची कार्य 31/3/01 अखेर	146
74	6.12	जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थांचे कार्य 31/3/01 अखेर	147

पुढे चालु..

1	2	3	4
75	6.13	जिल्हयातील उत्पादन आणि सामाजीक सेवा संस्थाचे कार्य 31/3/2001 अखेर	150
76	6.14	जिल्हयातील उत्पादन आणि सामाजीक सेवा संस्थाचे संस्थी यांचे प्रमुख कार्याचा तपशिल 31/03/01 अखेर	151
77	6.15	जिल्हयातील नियंत्रीत बाजार पेठांची माहिती 31/03/01 अखेर	152
78	6.16	जिल्हयातील सावकारांची संख्या आणि त्यानी दिलेली कर्जे 31/3/01 अखेर	157
		7. वैद्यकीय व आरोग्य सेवा	
79	7.1	सार्वजनिक व अर्थ सहाय्यीत संस्थामार्फत उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधांची माहिती 2000	158
80	7.2	नोंदणी केलेल्या जन्म - मृत्युची संख्या 2000	160
81	7.3	विविध कारणानुसार मृत्युची संख्या 2000	162
82	7.4	माता बाल संगोपन कार्यक्रम अंतर्गत लस टोचणी	163
83	7.5	जिल्हयातील कुटूंब नियोजन केंद्रांची संख्या 2000-01	164
		8. शिक्षण	
84	8.1	2001 च्या जनगणननेनुसार तालुकावार साक्षरता	165
85	8.2	शैक्षणिक संस्थो आणि शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या 1999-2000	166
86	8.3	पुर्व प्राथमिक , प्राथमिक , माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वर्गवारी 1999-2000	167
87	8.4	इतर प्रकारच्या शैक्षणिक संस्था 1999-2000	168
88	8.5	आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना मिळणा-या शैक्षणिक सवलती 99-2000	169
89	8.6	प्राथमिक शिक्षणावरील खर्च 1999-2000	170
90	8.7	जिल्हयातील व्यवसाय मार्गदर्शन (कनिठ महाविद्यालये) व तांत्रिक शाळा (आठवी ते बारावी) 2000-01	171
91	8.8	जिल्हयातील प्रौढ शिक्षण कार्यक्रम 2000-01	171
92	8.9	शिक्षकांकरीता प्रशिक्षण संस्था 1999-2000	172
		9. वाहतूक व दळणवळण	
93	9.1(अ)	रेल्वे मार्गाची लांबी (31/03/01 वर्षा अखेर)	173
94	9.1(ब)	रेल्वे स्थानकांची तालुकावार यादी (31/03/01 या दिवशीची)	173
95	9.2	प्रकार व पृष्ठभाग या नुसार रस्त्यांची लांबी (31/03/01 अखेर)	174
96	9.3	वापरात असलेली मोटार वाहनांची संख्या (31/03/01 अखेर)	175

पुढे चालू..

1	2	3	4
97	9.4	महाराष्ट्रराज्य मार्ग परिवहन मंडळाची (प्रवासी) वाहतुक आकडेवारी 2000-01 वर्षाकरीता	176
98	9.5	महत्वाच्या रस्त्यावरील वाहतुक गणना (वाहतुक गणना डिसेंबर-2000)	177
99	9.6	पोस्ट, तारघरे व दुरध्वनी सेवा व दुरदर्शन संच यांची आकडेवारी 2000-01	186
		10. स्थानिक संस्था	
100	10.1	स्थानिक संस्थांचे उत्पन्न व खर्च वर्ष 2000-01 करीता	187
101	10.2	ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च 2000-01 या वर्षाकरीता	188
102	10.3	जिल्हापरिषदेचे बाबवार उत्पन्न व खर्च 2000-01 या वर्षाकरीता	191
103	10.4	महानगर पालिका , कटक मंडळे व नगरपालिकांचे उत्पन्न व खर्च 2000-01 या वर्षाकरीता	193
		11. नियोजन	
104	11.1	विविध विकास शिर्षाखाली झालेला योजनांतर्गत खर्च वर्ष 2000-01	194
105	11.2	योजनेखालील महत्वाची भौतीक साध्ये 2000-01 वर्षाकरीता	196
106	11.3	रोजगार हमी योजना 2000-01 वर्षाकरीता	211
107	11.4	रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे, त्यावरील रोजगार व खर्च 2000-01 या वर्षाकरीता	212
108	11.5	पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधी केलेल्या उपाय योजना 2000-01	213
109	11.6	संकरीत व अधीक उत्पादने देणा-या पिकांच्या जाती व त्याखालील क्षेत्र 2000-01 वर्षाकरीता	215
110	11.7	जिल्हयातील रासायनिक खतांचे वाटप 2000-01 या वर्षाकरीता	218
111	11.8	जिल्हयातील साखर कारखाने 2000-01 या गाळप हंगामासाठी	**
112	11.9	दुग्ध संस्थांची संख्या वर्ष 2000-01	219
113	11.10	अवर्षण प्रवण कार्यक्रमांची प्रगती दर्शविणारा तक्ता वर्ष 2000-01	220
114	11.11	जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमाची प्रगती व त्याघरील तरतुदी व खर्च 2000-01	221
115	11.12	वीस कलमी कार्यक्रम 2000-01 वर्षाकरीता	224
116	11.13	विशेष घटक योजना 2000-01 वर्षाकरीता	225
117	11.14	जिल्हयाचा स्थानिक विकास कार्यक्रम वर्ष 2000-01	226

पुढे चालु..

1	2	3	4
		12. किंमती व निर्देशांक	
118	12.1	जिल्हयातील निवडक शेती मालाचा सरासरी घाऊक किंमती एप्रिल, 2000 ते मार्च, 2001	227
119	12.2	जिल्हयातील मुख्यालय ठिकाणां च्या महत्वाचा वस्तुंच्या मासिक सरासरी किरकोळ किंमती वर्ष 2000	229
120	12.3	कामगाराचे ग्राहक किंमतीचे निर्देशांक सन, 2000-01	233
		13. न्याय व प्रशासन	
121	13.1	जिल्हयातील पोलीस अधिकारी / कर्मचा-यांची एकूण संख्या सन, 2000-01	202
122	13.2	जिल्हयातील गुन्हया संबंधीची आकडेवारी सन, 2000-01	235
123	13.3	तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगार सन, 2000-01	237
124	13.4	तुरुंगात दाखल केलेले गुन्हेगारांचे वयोगटानुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण सन, 2000-01	238
125	13.5	दिवाणी व फौजदारी न्यायालयात निकालात काढलेली कामे/प्रकरणे 2000-01	239
		14. बँकींग व विमा	
126	14.1	जिल्हयातील बँक कार्यालये , वर्गीकृत बँकांची संख्या, ठेवी व कर्जे 2000-01	240
127	14.2	जिल्हयातील 31 मार्च 2000 रोजी असलेल्या संयुक्त भांडवली संस्था	241
128	14.3	उतरविलेल्या विमा पत्रांची संख्या व विम्यांची रक्कम सन, 2000-01	241
		15. संकीर्ण	
129	15.1	जिल्हयातील चित्रपटगृहांविषयी आकडेवारी सन, 2000-01	242
130	15.2	गोळा केलेली अल्पबचत गुंतवणूक व खातेदारांची संख्या , सन 2000-01	243
131	15.3	तहसिलनिहाय गाळा केलेला जमीन महसुल, सन 2000-01	244
132	15.4	मुद्रणालये आणि त्यात छापलेली व प्रकाशीत केलेली वर्तमानपत्रे आणि नियतकालीके 31/03/2001 या दिवशी	245
133	15.5	स्वस्तधान्य दुकानांना पुरविलेले तांदुळ, गहू, साखर सन, 2000-01	247
134	15.6	जिल्हयातील मागणी व वसुल केलेले धान्य सन 2000-01	247
135	15.7	जिल्हयातील 1999 मधील लोकसभा व विधानसभा निवडनुक संबंधी आकडेवारी	248
136	15.8	जिल्हयातील 31 मार्च 2001 रोजीची अधिकारी व प्रवासी यांचेसाठी असलेल्या विश्रामगृहांची तालुकानिहाय यादी	250
137	15.9	निवडक निर्देशांकाचे कल 2000-01	252

टिप :- " ** " तक्त्यातील माहिती निरंक आहे.

भाग - 1

दृष्टिक्षेपात जिल्हा

जिल्हा-गडचिरोली

2000-2001

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2000-2001

दृष्टिक्षेपात जिल्हा - गडचिरोली

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
एक	**प्राकृतिक रचना**			
	अ) भौगोलीक स्थान			
	1) उत्तर अक्षांश	अंश	18.43ते 21.50	16.4ते 22.1
	2) पूर्व रेखांश	अंश	79.45ते80.53	72.6ते80.9
	ब) हवामान			
	तापमान (1999-2000)		(1998)	(1999-2000)
	1) किमान	डिग्री सेल्सीयस	11.3	5.0
	2) कमाल	डिग्री सेल्सीयस	47.3	47.7
			(2000)	(1995)
	3) पर्जन्य (सरासरी)	मि मी	1561.96	1292.53
	क) प्रशासकीय विभाग (2000-2001)			
	1) तालुके	संख्या	12	353
	2) पंचायत समित्या	संख्या	12	321
	3) टंचाईग्रस्त तालुके	संख्या	0	उ.ना.
	4) एकात्मिक ग्रामिण विकास प्रकल्प	संख्या	8	उ.ना.
	5) शहरे	संख्या	2	378
	6) गावे (एकूण) 2001 प्रमाणे	संख्या	1679	43722
	1) निर्जन	संख्या	163	उ.ना.
	2) वस्ती असलेली	संख्या	1516	43722
	7) क्षेत्रफळ	चौ कि मी	14412	307713
दोन	**प्रशासकीय संस्था 2000-2001**			
	1) पंचायत समिती	संख्या	12	321
	2) महानगर पालिका	संख्या	0	15
	3) नगरपालिका	संख्या	2	228
	4) कटक मंडळे	संख्या	0	7
	5) ग्रामपंचायती	संख्या	467	27738
	6) पोलीस ठाणी	संख्या	28	908(2000)
	7) पोलीस आऊट पोष्ट	संख्या	25	1775(2000)

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
तीन	**लोकसंख्या 2001 प्रमाणे**			
	1) ग्रामीण लोकसंख्या	आकडे हजारात	903	55732
	2) नागरी लोकसंख्या	आकडे हजारात	67	41020
	3) एकूण लोकसंख्या	आकडे हजारात	970	96752
	4) अनुसूचित जातीची लोकसंख्या (1991)	आकडे हजारात	96	8758
	5) अनुसूचित जातीची लोकसंख्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी	टक्केवारी	12.20	11.09
	6) अनुसूचित जमातीची लोकसंख्या (1991)	आकडे हजारात	305	7318
	7) अनुसूचित जमातीची लोकसंख्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी	टक्केवारी	38.75	9.27
	8) पुरुष (2001)	आकडे हजारात	491	50334
	9) स्त्रिया	आकडे हजारात	479	46418
	10) स्त्रि-पुरुष प्रमाण	हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण	976	922
	11) घनता	दर चौ.कि मी क्षेत्रातील लोकसंख्या	63	314
	12) साक्षरतेचे प्रमाण (2001)			
	1) एकूण	टक्केवारी	60.29	77.3
	2) पुरुष	टक्केवारी	69.72	86.3
	3) स्त्रिया	टक्केवारी	50.64	67.5
	4) राज्यामध्ये जिल्हयाचा क्रमांक	संख्या	-	0
चार	**कृषि (अस्थायी)**		(1999-00)	(1999-00)
	1) भौगोलीक क्षेत्र	हजार हेक्टर	1491	30758
	2) जंगलव्याप्त क्षेत्र	हजार हेक्टर	1184	5306
	त्याची भौगोलीक क्षेत्राशी टक्केवारी	टक्केवारी	79.41	17.25
	3) शेतीस उपलब्ध नसलेली जमीन			
	अ) बिगर शेती वापराखालील जमीन	हजार हेक्टर	17	1301
	ब) पडीत आणी लागवडीलायक नसलेली जमीन	हजार हेक्टर	32	1696
	क) एकूण (अ + ब)	हजार हेक्टर	49	2997

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
	4) पडित जमिनी व्यतीरिक्त लागवड न केलेली इतर जमिन			
	1) कायम गुरे चरण आणि इतर	हजार हेक्टर	22	1341
	2) झाडे झुडपाखालील जमीन	हजार हेक्टर	5	226
	3) लागवडीयोग्य परंतू पड जमीन	हजार हेक्टर	13	903
	5) पडित जमीन			
	1) चालू पड	हजार हेक्टर	12	1189
	2) इतर पड	हजार हेक्टर	13	1161
	6) पिकाखालील जमीन			
	1) पिकाखालील निव्वळ क्षेत्र	हजार हेक्टर	193	17636
	2) दुसोटा क्षेत्र	हजार हेक्टर	18	4620
	3) एकूण पिकाखालील क्षेत्र	हजार हेक्टर	212	22256
	7) ओलित क्षेत्र		**(1999-00)**	**(1999-00)**
	1) निव्वळ ओलीत क्षेत्र	हजार हेक्टर	56	2959
	2) एकूण ओलीत क्षेत्र	हजार हेक्टर	62	3647
	8) महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र (अन्नधान्य)	हजार हेक्टर	192	13382
	9) वहित धारण जमिन (अंतिम 1990-91)			
	1) 2 हेक्टरपेक्षा कमी	हजार हेक्टर	70	6003
	2) 2 ते 10 हेक्टर	हजार हेक्टर	38	3297
	3) 10 हेक्टरपेक्षा जास्त	हजार हेक्टर	2	171
	10) जमिन महसूल वसुली (2000-01)	लाख रुपये	2.29	9200
	11) जिल्हा परिषदेचा व पं.स.चा उपकर	हजार रुपये	1825	उ.ना.
पाच	**पशुसंवर्धन (पशुगणना 1997)**			
	1) एकूण पशुधन	संख्या हजारात	~~1016~~ 973	39793
	2) गायी व बैल	संख्या हजारात	612	17949
	3) म्हशी व रेडे	संख्या हजारात	95	6484
	4) मेंढया व शेळया	संख्या हजारात	217	14716
	5) कोबडया व बदके	संख्या हजारात	~~973~~ 1016	34984

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
सहा	**सहकार (2000-2001)**			
	1) सहकारी संस्था	संख्या	740	158016
	2) प्राथमिक कृषि सहकारी पत संस्था	संख्या	139	20555
	3) प्राथमिक कृषि सहकारी पत संस्थांची सभासद संख्या	संख्या हजारात	36	10205
	4) सहकारी दुग्ध संस्था	संख्या	107	22035
	5) प्राथमिक कृषि पत संस्थांनी दिलेली कर्जे	रुपये कोटीत	24	3178
सात	**जलसिंचन**		—	
	(जून 2000 अखेरपर्यंत पुर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्याखालील लाभक्षेत्र			सन - 1999
	1) मोठे प्रकल्प	संख्या	1	31
	2) मध्यम प्रकल्प	संख्या	1	165
	1 व 2 चे लाभक्षेत्र	हजार हेक्टर	191	उ.ना.
	3) लघु प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	25	2175
	लाभक्षेत्र	हजार हेक्टर	5	उ.ना.
	4) सिंचन विहीरीखाली भिजणारे क्षेत्र	हजार हेक्टर	3	1912
आठ	**उद्योग (2000 अखेर)**			सन - 1999
	1) नोंदणीकृत कारखाण्याची संख्या	संख्या	115	34603
	2) नोंदणीकृत चालू कारखाण्याची संख्या (उत्पादन चालू कारखाने)	संख्या	109	29562
	3) सहकारी साखर कारखाण्यांची संख्या (2000-2001)	संख्या	0	143 (1999-2000)
	4) सहकारी साखर कारखाण्यातील उत्पादन (2000-2001)	हजार मे.टन	0	6356
	5) सर्व सुत गीरण्यांची संख्या (2000-2001)	संख्या	0	233

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
नऊ	**विज (31/03/2001 अखेर)**			**(31/03/98)**
	1) विज पुरवठा केलेली शहरे व खेडी	संख्या	1567	39413
	2) विद्यृतीकरण झालेल्या गावांची	संख्या	1563	उ.ना.
	3) विज पुरवठा केलेले पंप संच (मार्च 2001 अखेर पर्यंत)	संख्या "000"	6	2328
	4) बसविण्यात आलेले गोबर गॅस संयंत्रे 2000-2001	संख्या	17132	उ.ना.
दहा	**सार्वजनिक आरोग्य (2000-2001)**			
	1) रुग्णालये	संख्या	14	1102
	2) दवाखाने	संख्या	22	1544
	3) प्राथमिक आरोग्य केंद्रे	संख्या	46	1768
	4) प्राथमिक आरोग्य पथके (अस्थायी)	संख्या	36, (1999 - 2000)	169 (2000-2001)
अकरा	**शिक्षण (2000-2001)**			
	1) एकूण प्राथमिक शाळा	संख्या	1380	65727
	2) प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या हजारात	142	12013
	3) प्राथमिक शाळेतील शिक्षक	संख्या हजारात	4	311
	4) प्रत्येक शिक्षकामागे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या	33	39
बारा	**माध्यमिक शिक्षण (2000-2001)**			
	1) दुय्यम शाळा	संख्या	192	15284
	2) शाळेतील एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	83	9242
	3) शाळेतील शिक्षक	संख्या हजारात	3	253
	4) प्रत्येक शिक्षकामागे माध्यमिक शाळेतील विद्यार्थी	संख्या	33	37
तेरा	**उच्च शिक्षण (2000-2001)**			
	1) संस्था	संख्या	20	1599
	2) एकूण विद्यार्थी	संख्या हजारात	6	939

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
चौदा	**अ) प्रौढ शिक्षण (2000-2001)**			**(1999 - 2000)**
	1) प्रौढ शिक्षण केंद्रे	संख्या (वर्ग)	13047	उ.ना.
	2) प्रौढांची उपस्थिती (साक्षर)	संख्या हजारात	144	उ.ना.
	ब) तांत्रिक व व्यवसाय शिक्षण (2000-2001)			
	1) औद्योगीक प्रशिक्षण संस्था	संख्या	12	613
	1) शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था	संख्या	12	347
	2)अशासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था	संख्या	0	266
	2) शासकीय व अशासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थांची प्रवेश क्षमता	संख्या	2108	92384
	3) पदवी अभ्यास क्रमाच्या तांत्रिक संस्था	संख्या	0	140
	व त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता	संख्या	0	41000
	4) पदविका अभ्यास क्रमाच्या	संख्या	1	184
	तांत्रिकसंस्था व त्यांची पहिल्या वर्षासाठी प्रवेश क्षमता	संख्या	210	33270
	5) व्यवसाय शिक्षण संस्था	संख्या	14	उ.ना.
	(माध्यमिक व उच्च माध्यमिक गट) व त्यांची प्रवेश क्षमता	संख्या हजारात	1	उ.ना.
पंधरा	**परिवहन व वळणवळण**			
	(मार्च 2001 अखेर)			
	1) एकूण रेल्वेमार्ग लांबी	किमी	18.46	5459
	2) रस्त्यांनी जोडलेली गांवे			
	अ) बारमाही	संख्या	983	36275
	ब) हंगामी,	संख्या	393	2654
	3) एकूण रस्त्यांची लांबी (पृष्ठांकीत)	किमी	6166	216968
	4) राष्ट्रीय महामार्गाची लांबी	किमी	56	3710
	5) राज्य महामार्गाची लांबी	किमी	1303.	32586
	6) महत्वाच्या जिल्हा रस्त्यांची लांबी	किमी	1041	45543
	7) इतर जिल्हा रस्त्यांची लांबी	किमी	1550	43511
	8) ग्रामीण रस्त्यांची लांबी	किमी	2138	91618

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा गडचिरोली	महाराष्ट्र राज्य
1	2	3	4	5
सोळा	**एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम**			
	1) दारिद्रय रेषेखालील कुटूंबे 1997-98 च्या सर्वेक्षणानुसार	संख्या लाखात	108 (अस्थायी)	38.19 (अस्थायी)
	स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना			
	2) स्वरोजगारांची संख्या 2000-01	संख्या	939	87998
सतरा	**रोजगार निर्मीती (2000-01)**			
	अ) रोजगार हमी योजना	मनुष्य दिवस (लाखात)	12.66	1112
	ब) जवाहर ग्राम समृध्दी योजना (2000-01 अखेर)	मनुष्य दिवस (लाखात)	5.94	316
अठरा	**आदिवासी कल्याणकारी योजना (2000-01)**			**(1997-98)**
	आदिवासी करीता आश्रमशाळा	संख्या	90	731
	विद्यार्थी	संख्या	26780	248298
एकोणविस	**मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना**		**(1999-00)**	**(1994-95)**
	अ) मागासवर्गीयांसाठी वस्तीगृहे	संख्या	2	192
	ब) वस्तीगृहात राहणारे विद्यार्थी	संख्या	150	12797
वीस	**जिल्हा नियोजन (2000-01)**			
	1) वार्षिक योजनेतील मंजूर तरतूद	रुपये कोटीत	46.23	3794.79
	2) अनुशेष भरुन काढण्यासाठी तरतुद	रुपये कोटीत	2.25	242.10
एकेवीस	**नागरी पुरवठा (2000-01)**			
	1) रास्त भावाची दुकाने	संख्या	976	48655
	2) पुरविलेला एकूण साठा (डिसें.01 अखेर)			
	अ) गहू	हजार टन	60	1270
	ब) तांदुळ	हजार टन	63.51	684
	3) शासकीय गोदामे (30/06/2001)	संख्या	19	994
	4) साठविण्याची क्षमता (30/06/2001)	लाख मे.टन	0.09	584

टिप :- उ.ना. = उपलब्ध नाही. @ 500 पेक्षा कमी.

आधार :- 1) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

2) जिल्हा सांख्यिकी कार्यालय, गडचिरोली.



भाग - 2

समालोचन

जिल्हा-गडचिरोली

2000-2001

-: सामाजिक व आर्थिक समालोचन - 2000-2001 :-
जिल्हा :- गडचिरोली
1) स्थान व भौगोलीक वैशियष्टे

1.1 भौगोलीक स्थान

पुर्विच्या चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन होवून गडचिरोली हा नविन जिल्हा 26 ऑगष्ट, 1982 पासून अस्तीत्वात आला. भौगोलीक दृष्टया हा जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेस असून उत्तर अक्षांश 19 अंश ते 21 अंश व पुर्व रेखांश 80 अंश ते 81 अंश च्या दरम्यान पसरला आहे. या जिल्हयाच्या उत्तरेस भंडारा जिल्हा, पुर्वेस मध्य प्रदेशातील राजनांदगांव व बस्तर जिल्हा, दक्षिणेस आंध्र प्रदेशातील करीम नगर व आदिलाबाद जिल्ह व पश्चिमेस चंद्रपूर जिल्हा आहे. वैनगंगा ही या जिल्हयाची प्रमुख नदी असून ती जिल्हयाच्या पश्चिम दिशेकडून वाहते व ती जिल्हयाची सिमा रेषा आहे.

1.2 क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग

14412 चौरस किलो मिटर क्षेत्रफळ असलेला गडचिरोली जिल्हा आकारमानाने महाराष्ट्रात चौथ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी (307713 चौ.कि.मी.) 4.68 टक्के क्षेत्रफळ गडचिरोली जिल्हयाने व्यापलेले आहे. जिल्हा विभाजनापूर्वी गडचिरोली आणि सिरोंचा हया दोनच तहसिली अस्तित्वात होत्या. तसेच गडचिरोली व अहेरी हे दोन महसूल उपविभाग होते. विभाजना नंतर गडचिरोली जिल्हा हा गडचिरोली आरमोरी, कुरखेडा,धानोरा, सिरोंचा, अहेरी व एटापल्ली या आठ तहसिलीमध्ये विभागला गेला अलिकडे 7 ऑगष्ट, 1992 ला महाराष्ट्र शासनाने जिल्हयाच्या भौगोलीक परिस्थितीचा आढावा घेता महसूल विभागाची पुनर्रचना करुन देसाईगंज उपविभाग निर्माण करण्यात आला. तसेच देसाईगंज, कोरची , भामरागड व मुलचेरा हया चार नविन तहसिली निर्माण केल्या असून त्या ठिकाणी तहसिल कार्यालय कार्यरत आहेत. या जिल्हयाचे जिल्हा मुख्यालय गडचिरोली येथे आहे. जिल्हयात 2001 च्या जनगणनेनुसार 2 शहरे व 1679 खेडी असून त्यापैकी 1516 खेडी लोकवस्ती असलेली व 163 ओसाड आहेत.

बारा पंचायत समित्या या जिल्हयात कार्यरतअसून उपरोक्त बाराही पुनर्रचित तहसिलीच्या ठिकाणी त्यांची मुख्यालचे आहेत.

या जिल्हयात वडसा (देसाईगंज) येथे नगरपरिषद पुर्वीपासूनच अस्तित्वात आहे. परंतु 26 ऑगष्ट, 1982 पासून नविन गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आल्या नंतर व गडचिरोली हे जिल्हयाचे मुख्यालय झाल्यानंतर गडचिरोली येथें जून, 1985 पासून नगरपरिषद स्थापन करण्यात आली व जुन्या गडचिरोली ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपरिषदेमध्ये करण्यात आले.

1.3 भौगोलीक वैशिष्टे

या जिल्हयाची अनेक भौगोलीक वैशिष्टे असून वैनगंगेचे खोरे हे या वैशिष्टयापैकी एक आहे. हे खोरे साधारण पणे गडचिरोली जिल्हयाच्या पश्चिमेस असून त्यामध्ये गडचिरोली, आरमोरी, चामोर्शि, अहेरी व सिरोंचा या तहसिलीचा भाग समाविष्ट होतो. जिल्हयातील धानोरा, एटापल्ली, अहेरी व सिरोंचा या तहसिलीचा भाग उंचवटयाचा असून या भागात घनदाट जंगले आहेत. याच भागात अहेरी, भामरागड, टीपागड, पळसगड व सुरजागड या प्रमुख टेकडया असून जिल्हयातील सर्वात उंच शिखर गडलगट्टा पहाडामध्ये (967) मीटर आहे. या टेकडयातील रांगांना निरनिराळी नावे असून त्यापैकी टिपागड रांगा, सिरोंचा जवळील सिरोंचा रांगा व इंद्रावतीजवळील सुरजागड रांगा या महत्वाच्या आहेत. टिपागड रांगेची समुद्रसपाटी पासूनची उंची 609 मीटर असून सिरोंचा रांगाची उंची 548 मीटर इतकी आहे.

1.4 भूगर्भरचना

सिरोंचा, अहेरी व आरमोरी तहसिलीचा काही भाग वगळता संपूर्ण जिल्हयात आर्कीयन कालीन खडक आढळतात. यात प्रामुख्याने ग्रॅनाईट नाईल ग्रॅब्रोब्रेसरक इ. खडकांचा समावेश होतो. सिरोंचा व अहेरी येथे कडप्पकालीन चुनखडक व मातीचे खडक आढळतात तसेंच सिरोंचाच्या दक्षिणेस व आरमोरी, देसाईगंज भागात गोंडवाना कालीन खडक आढळतात.

1.5 नद्या

या जिल्हयात पश्चिम सिमेवरुन वैनगंगा नदी वाहते. दक्षिण सिमेवरुन गोदावरी व पूर्व सिमेवरुन इंद्रावती ही नदी वाहते. या तीन नद्या जिल्हयातील प्रमुख नद्या आहेत. त्याशिवाय दिना, गाढवी, खोब्रागडी, कठाणी, पोर निब्रा, कोटरी, पर्लकोटा, पालमगौतम व बांडीया या महत्वाच्या नद्या आहेत. वैनगंगा ही वर्धा नदीस उजव्या किना-याने शिवणी या गावाजवळ मिळते पुढे हा संयुक्त प्रवाह प्राणहीता या नावाने सिरोंचा पर्यंत जातो. सिरोंचा जवळ ही प्राणहीता नदी गोदावरीला मिळते. याशिवाय जिल्हयात अनेक ओढे, नाले व लहान नद्या असून पावसाळयात रुद्ररुप धारण करुन दळणवळण खंडीत करुन टाकतात या जिल्हयात वैनगंगा, गोदावरी व इंद्रावती अश्या तीन सिमावर्ती नदया असून त्या अनुक्रमे मैकल (द्रुग जिल्हा मध्यप्रदेशाचे विभाजन होवून नव्याने निर्माण झालेले छत्तीसगड राज्य), त्रैंबक (नाशिक जिल्हा) व चंद्रगीरी (पूर्व ओरीसा) रांगामध्ये उगम पावतात. वैनगंगा व गोदावरीच्या पात्रांची रुंदी अनेक ठिकाणी 1 कि.मी. इतकी भरते. इंद्रावती नदीचा प्रवाह वेगवान खोल व बारमाही असून नौका नयनासाठी उपयोगी नाही. तथापी जंगलातील सागवणी लाकूड प्रवाहात टाकून खालच्या बाजूला वाहून नेण्यासाठी या नदीचा उपयोग करुन घेतला जातो. याशिवाय वर दर्शविलेल्या अनेक नद्या बारमाही वाहना-या आहेत. त्यापैकी दिना नदीवर चामोर्शि तहसिलीमधील रेगडी गावाजवळ मध्यम आकाराचे धरण बांधले असून त्या तहसिलीमधील बरेच क्षेत्र या ओलीताखाली येते.

गडचिरोली जिल्हयात अनेक लहान मोठे तलाव असून त्यांची संख्या 2124 इतकी आहे. त्यापैकी पाटबंधारे विभागाचे 22 व जिल्हा परिषदेचे 2102 तलाव आहेत. त्यातील पाण्याच्या शेतीसाठी प्रामुख्याने उपयोग करुन घेतला जातो. त्याशिवाय मत्स्यव्यवसायासाठी हे तलाव उपयोगात आणले जातात.

1.6 वने

गडचिरोली जिल्हयात वनाखालील क्षेत्र महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त आहे.त्याची माहीती परिच्छेद क्रमांक 3 मध्ये दिलेली आहे.

1.7 हवामान व पर्जन्यमान

गडचिरोली जिल्हयात उन्हाळा कडक असून हिवाळयात तापमान बरेच खाली येते. मे आणि जून हे महिने सगळयात उष्ण समजले जातात. तीव्र उष्णतामान व घनदाट जंगले असल्यामुळे हवेत असणारे बाष्पाचे मोठे प्रमाण यामुळे, तेथील हवामान बरेच वेळा त्रासदायक होते. तथापी एप्रिल अखेरपर्यत रात्र थंड असते. मे महिना हा कडक उन्हाळा असतो. या जिल्हयात हिवाळा देखील कडकच असतो. डिसेंबर व जानेवारी महिन्यात कडाक्याची थंडी पडते. 1998 या वर्षी जिल्हयात सिरोचा या केंद्रावर कमाल व किमान तापमानाची वार्षिक सरासरी अनुक्रमे 47.3 व 11.3 अंश सेल्सियस अशी नोंदल्या गेली.

या जिल्हयात मुख्यत्वे करुन मान्सून या-यापासून पाऊस पडतो. तसेच बहूतेक भाग हा भारी व निश्चित स्वरुपाचा पावसाच्या पट्टयात येतो. सर्वसामान्य पर्जन्यमान 1400 ते 1500 मि.मि. इतके असते जून ते आक्टोंबर या काळात पाऊस पडतो. त्यातही सर्व साधारणत: 60 टक्के पाऊस जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर महिण्यात पडतो. दरवर्षी सरासरी 60 ते 70 दिवस पाऊस पडतो. या जिल्हयाचे 2000 मधील सरासरी पर्जन्यमान 1561.9 मि.मि. इतके आहे.

1.8 **जमीन व तीचे प्रकार**

जमीनीच्या दृष्टीने या जिल्हयाचे तीन विभागामध्ये वर्गीकरण करता येईल.

अ) **वैनगंगा नदी किना-याचा सखल भाग**

जिल्हाच्या पश्चिमेला उत्तर दक्षिण वैनगंगा नदी वाहते. नदी किना-याचा सखल भाग सुपीक असून चिंकन् मातीचा आहे. यातील जमीन लोम वाळू मिश्रीत व मूरमाड आहे. गडचिरोली, आरमोरी, चामोर्शि तहसिलीचा भाग यात समाविष्ट असून भात हे प्रमूख पिक आहे.

ब) **गोदावरी किना-याचा सखल भाग**

जिल्हयाच्या पूर्व पश्चिम गोदावरी नदीच्या किना-याची भारी गाळाची जमीन असून काळी व सुपीक आहे. यात सिरोंचा आणि अहेरी तहसिलीचा भाग येतो.

क) **पूर्वेकडील उंचवटयाचा व डोंगराळ भाग**

या जिल्हयाचा 3/4 भाग या प्रकारामध्ये येतो मात्र. याच विभागामध्ये भामरागड, टिपागड, पळसगड व सुरजागड या प्रमूख टेकडयांच्या रांगा असून धनदाट जंगले आहेत. या विभागातील जमीन लोम, वालूकामय व मूरमाळ अशी आहे. लालसर चिकन माती या भागात असून त्यामध्ये प्रामूख्याने भात हे पीक घेतल्या जाते.

2) लोकसंख्या

2.1 2001 चे जनगणनेनूसार गडचिरोली जिल्हयाची एकूण लोकसंख्या 969960 इतकी असून त्यापैकी 490809 पूरुष व 479151 स्त्रिया आहेत. सर्वात जास्त म्हणजे 17.06 टक्के (165511) लोकसंख्या चामोर्शि तहसिलीत आहे. त्यानंतरचा क्रमांक गडचिरोली तहसिलीचा असून त्या तहसिलीची लोकसंख्या 13.02 टक्के (126293) इतकी आहे. त्यानंतर अनुक्रमे अहेरी तहसिल 10.67 टक्के (103502), आरमोरी 9.36 टक्के (90841), कुरखेडा 8.03 टक्के (77923), धानोरा 7.97 टक्के (77353), देसाईगंज 7.85 टक्के (76145), सिरोंचा 7.19 टक्के (69769), मुलचेरा 4.08 टक्के (39600), कोरची 4.19 टक्के (40718) व सर्वात शेवटी भामरागड 3.26 टक्के (31664) अशी लोक संख्येची विभागणी आहे.

२.२ **लोक संख्येची घनता**

गडचिरोली जिल्हयात लोकसंख्येची घनता 63 इतकी आहे. जिल्हयात सर्वात जास्त लोकसंख्येची घनता चामोर्शि तहसिलीत 162 इतकी आहे तर सर्वात कमी म्हणजे 18 इतकी एटापल्ली तहसिलीची आहे.

2.3 **लोकसंख्येचे ग्रामीण व शहरी वर्गीकरण**

जिल्हयाची ग्रामिण व नागरी लोकसंख्या अनुक्रमे 902710 व 67250 असून जिल्हयात वडसा देसाईगंज व गडचिरोली अशा दोन नगरपरिषदा क वर्गात मोडतात.2001 चे जनगणने प्रमाणे अहेरी व आलापल्ली ही शहरे नागरीतुन वगळण्यात आली. शहरी लोकसंख्येची जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येशी टक्केवारी फक्त 6.93 टक्के आहे. तर महाराष्ट्रात हेच प्रमाण 38.89 टक्के इतके आहे. वडसा नगरपरिषदेची लोकसंख्या 24786 व गडचिरोली नगरपरिषदेची लोकसंख्या 42464 मिळून एकूण शहरी लोकसंख्या 67250 इतकी आहे. 1982 ला गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आल्या नंतर नगर परिषद गडचिरोलीच्या क्षेत्रात कर्मचारी व कार्यालयांचे संख्येत ब-याच प्रमाणात वाढ झाली असून 1991 ते 2001 या कालावधीत दशवर्षीय वाढीचे प्रमाण 23.25 टक्के आहे.

2.4 लोकसंख्येतील स्त्रि-पुरुष प्रमाण

जिल्हयातील स्त्रियांचे दर हजारी पुरुषांशी प्रमाण 976 इतके आहे. राज्याचे हेच प्रमाण 922 इतके आहे. जिल्हयातील नागरी भागातील प्रमाण 952 तर ग्रामीण भागातील प्रमाण 978 इतके आहे.

2.5 अनुसूचित जाती/जमाती

जिल्हयातील गडचिरोली, आरमोरी व चामोर्शि तहसिलीतील 187 गावे वगळता इतर सर्व गावे आदिवासी म्हणून घोषीत करण्यात आली. त्यामूळे गडचिरोली हा प्रामूख्याने आदिवासींची वस्ती असलेला जिल्हा समजण्यात येतो. जिल्हयाच्या एकूण 787010, लोकसंख्येपैकी 304535 लोकसंख्या आदिवासींची आहे. तसेच अनुसुचीत जातींची लोकसंख्या 95996 आहे. जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी 38.70 टक्के लोकसंख्या ही आदिवासींची (अनू.जमाती) असून 12.20 टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जातीची आहे.

जिल्हयात कुरखेडा,धानोरा,अहेरी, एटापल्ली,सिरोंचा,कोरची,भामरागड व मुलचेरा या तहसिलीत आदिवासींचे प्रमाण जास्त असून ते जिल्हयातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या 75.44 टक्के आहे.

2.6 कामगार.

1991 चे जनगणनेप्रमाणे या जिल्हयामध्ये 358563 इतके मुख्य काम करणारे असून 64883 इतके सिमांतीक काम करणारे आहेत., उरलेले 363564 हे काम न करणारे आहेत. हे प्रमाण जिल्हयाच्या लोकसंख्येचा अनुक्रमे 45.56 टक्के व 8.24 टक्के व 46.20 टक्के इतके पडते.मुख्य काम करणा-यापैकी 56.11 टक्के व्यक्ती शेतकरी व 28.77 टक्के शेतमजूर असून 15.12 टक्के उद्योग, उत्पादन प्रक्रीया, दुरुसती सेवा इत्यादीशी संबंधीत आहेत. यात 54220 व्यक्ती म्हणजेच 13.24 टक्के कामगार हे इतर व्यवसायांशी निगडीत आहे.

2.7 लोकसंख्येशी वयोगटानूसार रचना

हा जिल्हा 1982 मध्ये निर्माण केला असल्याने 1981 चे जनणनेनूसार या जिल्हयाची लोकसंख्येशी वयोगटानूसार माहीती उपलब्ध नाही.

2.8 साक्षरता (ग्रामीण व नागरी)

गडचिरोली जिल्हयात 2001 चे जनगणनेनुसार 493000 साक्षर असून टक्केवारी 60.29 आहे.त्यापैकी 28900 (69.72 टक्के) पुरुष असून 205000 (50.64%) स्त्रिया आहेत. महाराष्ट्रातील हेच प्रमाण पुरुषा साठी 76.56 टक्के व स्त्रियांसाठी 52.32 टक्के इतके आहे. महाराष्ट्राचे एकूण साक्षरतेचे प्रमाण 66.73 टक्के आहे. तालुकावार साक्षरतेची टक्केवारी तक्ता क्रमांक 8.1 मध्ये देण्यात आली आहे.

2.9 कुटूंबांची संख्या व राहती घरे

या जिल्हयात एकूण 162931 कुटूंबे असून राहती घरे 151682 इतकी आहेत. ग्रामीण भागात 147594 कुटूंबे असून व्याप्त घरांची संख्या 137355 इतकी आहे. नागरी भागातील हीच संख्या अनुक्रमे 15337 व 14327 इतकी आहे.

3) वने

3.1 गडचिरोली जिल्हयाच्या भौगोलीक क्षेत्रांपैकी 90 टक्के क्षेत्र वनानी आच्छादीत आहे. एवढे मोठे क्षेत्र जंगलाखाली असणारा महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा एकमेव आहे. जिल्हया मध्ये सामाजिक वनिकरणाचा एक भाग उघडला असून त्यांचे मार्फत रोप वाटीका स्थापन करण्यात येत असते. जिल्हयाचे 2000-2001 मधील वनक्षेत्र 13022 चौ.कि.मी.इतके आहे. या वन क्षेत्रापैकी 144 चौ. कि.मीं. क्षेत्र महसूल विभागाचे असून,वन विभागाचे 9928 चौ.कि.मी.क्षेत्र राखीव व 2795 चौ.कि.मी. क्षेत्र संरक्षित आहे. व 155 चौ.कि.मी. क्षेत्र अवर्गीकृत आहे.

3.2 जिल्हयाच्या उत्पादनाच्या दृष्टीने विचार केला असता वन संपत्तीचा महत्वाचा वाटा आहे. 1999-2000 या वर्षामध्ये वनाचे एकूण उत्पन्न 40.25 कोटी रुपये झाले असून वर्ष 2000-2001 मध्ये 39.92 कोटी रुपये उत्पादन झाले असून म्हणजेच 2000-2001 या वर्षात उत्पादनात 24.02 टक्के वाढ झालेली दिसून येते. जंगलातील उत्पादनात इमारती लाकूड,बांबू,जळाऊ लाकूड, बिडीपाने,गवत व डिंक इत्यादींचा समावेश आहे. जिल्हयात इमारती लाकडापासून 14.01 कोटी रुपये, बांबू पासून 8.13 कोटी रुपये, बिडी पाने पासून 26.11 कोटी रुपये महसूल प्राप्त झाला. जिल्हयात सागवान ही अत्यंत मौल्यवान प्रजात आहे. अहेरी व आलापल्ली येथील सागवान जगात प्रसिध्द आहे. तसेच आलापल्ली व भामरागडच्या क्षेत्रात बांबू मोठया प्रमाणात आढळते. कागद कारखाण्यासाठी कच्चा माल म्हणून बांबूचा वापर केला जातो. जिल्हयात वडसा,गडचिरोली,भामरागड,आलापल्ली व सिरोंचा असे पाच वन विभाग असून त्यांचे कडून पुनर्वनीकरण करण्यात येते. तसेच सामाजिक वनिकरण विभागाद्वारे पडीत जमीनीवर झाडांची लागवड केली जाते.

3.3 या जिल्हयात कोसा रेशमाच्या उत्पादनाच्या व्यवसाय फार पुर्वीपासूनच म्हणजेच सुमारे 200 वर्षापेक्षाही अधिक परंपरेने चालत आलेला आहे. आधुनिक काळात जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळ व विदर्भ विकास महामंडळाद्वारे कोसा उत्पादन करण्यात येते. खादी ग्रामोद्योग विभागामार्फत तुतीचे मलबेरी सिल्कचे उत्पादन होत असते.

1999-2000 या वर्षात टसर रेशीम उद्योगात एकूण 56541 अंडी पुंज वाटप करुन 258 कोसा उत्पादक शेतक-यांनी 1092316 नगात एकूण कोष उत्पादन करुन त्याची किंमत 371 हजार इतकी आहे.तुती रेशीम उद्योगात एकूण 3422 अंडीपूंज वाटप करुन 13 कोसा उत्पादक शेतक-यांनी 13 तुतीच्या झाडाची लागवड करुन 1064 किलो एकूण कोष उत्पादन घेण्यात आलेले आहे व त्यांची किंमत 116488 रुपये इतकी आहे.

4) कृषी

4.1 जमीनीचा वापर

जिल्हयाचे एकूण भौगोलीक क्षेत्र 1491500 हेक्टर आहे त्यापैकी 1999-2000 मध्ये 15.87 टक्के लागवडी लायक असून 1.45 टक्के क्षेत्र कायम गुरेचरण व इतर चराईच्या जमीनीखालील तर 3.29 टक्के क्षेत्र शेतीकरीता उपयुक्त नसलेले क्षेत्र आहे. सन 1999-2000 मध्ये एकूण लागवडी खालील 211752 हेक्टर क्षेत्रापैकी 193409 हेक्टर क्षेत्र निव्वळ पिकाखाली असून ते लागवडी खालील क्षेत्राच्या 91.34 टक्के इतके आहे. तसेच या जिल्हयातील जंगल व्याप्त क्षेत्राचे प्रमाण जास्त असून ते एकूण भौगोलीक क्षेत्राच्या 79.39 टक्के इतके आढळते. राज्यात सर्वात जास्त जंगलव्याप्त क्षेत्र व सर्वात कमी लागवडी खालील क्षेत्र गडचिरोली जिल्हयातच आहे.

4.2 पिक पध्दती

1999-2000 या वर्षामध्ये एकूण पिकाखालील क्षेत्र 211752 हेक्टर असून अन्य-धान्य पिकापैकी सर्वात जास्त क्षेत्र भात पिकाखाली म्हणजे 77.16 टक्के आहे. 1999-2000 या वर्षात सर्वात जास्त भाताखालील क्षेत्र चामोर्शि तहसिलीत 19967 हेक्टर म्हणजे 13.49 टक्के आहे. तसेच एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी डाळी वर्गीय पिकाखालील क्षेत्र 12.64 टक्के व गळीताचे क्षेत्र 7.31 इतके होते.

4.3 पिकांचे उत्पादन

1999-2000 च्या तुलनेत 2000-2001 या वर्षी एकूण तृणधान्याचे उत्पादनात जवळ-जवळ 91900 मे. टन ने घट झालेली आढळते. यात मुख्य: तांदूळ व ज्वारी या पिकाचा समावेश आहे. तर मका या पिकाचे उत्पादनात वाढ झालेली आहे

4.4 व 4.5 मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन

जिल्हयामध्ये भात,ज्वारी,गहू,तूर,तिळ व जवस ही मुख्य पिके होतात. सन, 2000-2001 मध्ये भाताचे दर हेक्टरी उत्पादन 783 कि.ग्रा.,गहू 600 कि.ग्रा.,ज्वारी 333 कि.ग्रा,हरभरा 506 कि.ग्रा.,तुर 750 कि.ग्रा,उळीद 355 कि.ग्रा.,तिळ 263 कि.ग्रा.व जवस 250 कि.ग्रा.अशा प्रकारे होते. तसेच मिरचीचे (लाल) उत्पादन 500 कि.ग्रा.एवढे होते. एकंदरीत गेल्यावर्षाचे तुलनेत मका,हरभरा, उडीद,मूग,जवस,मिरची या पिकांचे दर हेक्टरी उत्पादनात वाढ झालेली दिसून येते तर तांदूळ, ज्वारी व तिळ या पिकांचे दर हेक्टरी उत्पादनात घट झालेली आहे.

4.6 फळे व भाजीपाला

या जिल्हयामध्ये 1999-2000 या वर्षात फळे व भाजीपाला या पिकाखालील एकूण क्षेत्र 1387 हेक्टर असून एकूण पिकाखालील क्षेत्राच्या फक्त 0.66 टक्के होते. जिल्हयात फलोत्पादनाचे उत्पादन वाढविण्याकरीता फलात्पादन विभागामार्फत आंबा,पेरु,लिंबू,काजू,बोर,सिताफळ,मोसंबी व संत्री इत्यादी फळबागांची लागवड करण्यात आली आहे. जिल्हयात सोनापूर,रामगड,वाकडी,कृष्णा-नगर व कसनसूर येथे रोप वाटीका आहेत.

4.7 रासायनिक खतांचे वाटप

जिल्हयात सन - 2000-2001 या वर्षात 27743 मे. टिन रासायनिक खतांचे वाटप करण्यात आले.एकूण वाटप केलेल्या खत विक्री खाजगी संस्थानी 23366 मे.टन तर नियंत्रित संस्थांकडून 4377 मे.टन खतांचे वाटप करण्यात आले. देसाईगंज चामोर्शि तहसिलीत भात पिकासाठी 6697 मे.टन म्हणजे 63.17 टक्के वापर करण्यात आला. तर भामरागड तहसिलीत फक्त 0.08 मे.टन म्हणजे फक्त 22 टक्के खतांचा वापर करण्यात आला.

4.8 पिक संरक्षण

पिक संरक्षण योजनेतंर्गत जिल्हयामध्ये भात बियाने वाटप,प्रशिक्षण शिबिरे भरविणे, प्रात्यक्षिके घेणे तसेच सुधारीत कृषि अवजारे किटकनाशके व मुशकनाशके यासाठी अर्थ सहाय्य देण्यात येत. 1999-2000 या वर्षात उक्त योजनेवर जिल्हा कृषि विकास अधिकारी यांचे मार्फत 106.31 लक्ष रुपये खर्च करण्यात आले.

4.9 शेतमाल साठवणकीच्या व नियंत्रित बाजार पेठांच्या सोई

जिल्हायात गडचिरोली,आरमोरी, अहेरी व चामोर्शि येथे कृषि उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून त्याठिकाणी विक्री योग्य मालांची विक्री होते. सन 2000-2001 या वर्षी भात 79884 मे. टन ज्वारी 207 मे.टन, बरबटी 185 मे.टन, मुंग 293 मे.टन,उडीद 22 मे.टन,कुलथा 89 मे.टन,जवस 108 मे.टन,चना 29 मे.टन,पोपट 52 मे.टन,मिरची 597 मे.टन,मोट 07 मे.टन, भुंईमंग 64 मे.टन,तूर 388 मे.टन,तीळ 30 मे.टन अशा प्रकारे नियंत्रित बाजार पेठेत एकूण सर्व प्रकारच्या 72347 मे.टन धान्यांची आवक झालेली आहे.

4.10 जमीन सुधारणा

विभागीय मृद संधारण खात्या मार्फत जमिनीच्या विकासाची कामे केली जातात. उदा. मृद संधारण बांध घालणे व उतारावर समतल धालणे इत्यादी उपयाद्वारे जमीनाचा विकास केला जातो. याशिवाय महसूल विभागामार्फत अतिरिक्त घोषित केलेली जमीन लाभधारकांना वाटप केल्यानंतर मशागत व सुधारणा करण्यासाठी अर्थ सहाय्य देण्यात यते. तसेच विशेष घटक योजनातंर्गत जिल्हा कृषि अधिका-यामार्फत निवडक अनुसूचित जातीच्या शेतक-यांना जमीनी सुधारणा करण्याकरीता अर्थ सहाय्य दिल्या जाते. ओलीताच्या सोयीची उपलब्धता वाढविण्याकरीता अल्प भुधारक शेतक-यांना विहीरी बांधण्याकरीता भुविकास अधिका-या मार्फत कर्जाचे वाटप केल्या जाते. 2000-2001 या वर्षात जमीन सुधारण्या अंतर्गत 1.33 लाख रुपये खर्च करण्यात आले.

4.11 इतर विकास कार्यक्रम

शेती विकासाच्या दृष्टिने वार्षिक योजनांतर्गत निरनिराळे कार्यक्रम राबविले जातात. (1) फलात्पादन कार्यक्रमांतर्गत फलोत्पादन विभागामार्फत फळबाग लागवडीसाठी उत्सुक असलेल्या शेतक-यांना अर्थ सहाय्य व अनुदानाची व्यवस्था करण्यात येते. (2) कोरडवाहू विकासाच्या दृष्टिने शासनाने जिल्हयामध्ये कृषिपंढरी योजना सुरु केली आहे. (3) एकात्मिक ग्रामीण विकास योजनतअंतर्गत अत्यल्व व अल्प भुधारक शेतक-यांना नविन विहीरी बांधण्याकरीता व जुन्या विहीरींची दुरुस्ती करण्याकरीता, इलेक्ट्रीक मोटारपंप विकत घेण्याकरीता बैलजोडी व बैलगाडी विकत घेण्याकरीता राष्ट्रीयकृत व इतर बॅकाकडून कर्जरुपाने मदत मिळवून दऊन,अशा प्रकारे मिळणा-या कर्जावर कमीत कमी 25 ते 33 टक्के सुट ग्रामीण विकास यंत्रणेकडून देण्यात येते. (4) अल्प भुधारकांना रासायनिक खतांच्या वाढीव किंमतीवर सुट देण्यात येते. किटक नाशके व मुशकनाशके यासाठी कर्ज देण्यात येते. (5) सधन तेलबिया विकास कार्यक्रम. (6) कडधान्याच्या विकासाकरीता सधन उत्पादन कार्यक्रम याशिवाय जिल्हा परिषदेच्या वाढीव उपकराच्या उत्पान्नामधून देखील कृषि विकासावर खर्च करण्यात येतो.

5) जलसिंचन

5.1 जलसिंचनाची साधने

जलसिंचन करणा-या विविध प्रकारच्या साधनांनी भिजविले जाणा-या क्षेत्राचा विचार केला असता असे दिसून येते की, या जिल्हयामध्ये नैसर्गिक पावसाची उपलब्धता ब-याच प्रमाणात असल्यामूळे विहीरीच्या पाण्यावर होणारे ओलीताचे प्रमाण तलाव, कालवे, बोडया इत्यादी साधनांनी होणा-या ओलीताच्या प्रमाणापेक्षा नेहमी बरेच कमी राहात आले आहे. 1999-2000 या वर्षी ओलीताखालील निव्वळ क्षेत्र 55798 हेक्टर असून त्यापैकी 52823 हेक्टर तलाव कालवे,बोडया इत्यादी साधनांनी तर 2975 हेक्टर क्षेत्र विहीरीच्या पाण्याखाली भिजल्या गेले. ओलीताखालील एकूण क्षेत्र 62377 हेक्टर एवढे आहे. जिल्हयात 2121 जिल्हापरिषदेची व 22 राज्य शासनाची अशी एकूण 2143 तला व तसेच 5134 सिंचन विहीरी आहेत. या जिल्हयात एकही मोठा प्रकल्प नसून १ मध्यम प्रकल्प आहे.

5..2 निरनिराळया पिकाखालील एकूण क्षेत्र

1999-2000 या वर्षी पिकाखालील एकूण क्षेत्र 211752 हेक्टर आहे. त्यापैकी ओलीताखालील एकूण क्षेत्र 62377 हेक्टर म्हणजे 29.46 टक्के इतके होते. या जिल्हयातील भात हे मुख्य पिक असल्यामूळे ओलीताखालील असणा-या क्षेत्रापैकी बहुतांश क्षेत्र म्हणजे 93.80 टक्के या पिकाखाली आहे. त्यानंतर उरलेल्या क्षेत्रात मिरची, रब्बी ज्वारी,तिळ,भातीपाला इत्यादी किरकोळ पिके घेण्यात आली.

5.3 सिंचन क्षेत्र

जिल्हयात सन, 1999-2000 मध्ये निव्वळ भिजनारे क्षेत्र 55798 हेक्टर इतके होते. यापैकी सर्वाधिक ओलीताखालील निव्वळ क्षेत्र चामोर्शी तहसिलीत 27.73 टक्के असून त्याखालील गडचिरोली व आरमोरी तहसिलीत अनुक्रमे 15 व 14 टक्के होते. तर कोरची तहसिलीत सर्वात अत्यल्प क्षेत्र निव्वळ ओलीताखालील असल्याचे दिसून येते. 1999-2000 या वर्षात जिल्हयात ओलीताखालील एकूण क्षेत्र हे एकूण पिकाखालील क्षेत्राच्या 29.46 टक्के होते.

5.4 मोठे/लघु सिंचन प्रकल्प

या जिल्हायात 1400 ते 1500 मि. मिटर येवढा प्रचंड पडत असल्यामुळे विहीरीद्वारे सिंचन फार कमी आहे. लहान-लहान बांध घालून पावसाचे वाहून जाण्णरे पाणी तलाव अथवा बोडया यामध्ये साठवून ठेऊन त्याव्दारे भात शेतीला पाणी देण्याची प्रथ या जिल्हयात पुर्वापार चालू आहे. जिल्हयात एकही मोठा प्रकल्प नाही. परंतू भंडारा जिल्हयातील इटियाडोह प्रकल्पाचे कालव्याद्वारे 8053 हेक्टर क्षेत्र भिजविण्यात आले. तर रेगडी येथील दिना मध्यम प्रकल्पाद्वारे 10635 हेक्टर क्षेत्रात सिंचन झाले. चामोर्शि तहसिलीतील मुखडी मुलचेरा या गावाजवळ चेन्ना नदीवर मध्यम प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले होते. त्या कालव्यांची लांबी 14 कि.मी.राहणार असून 2230 हेक्टर जमीनीला पाणी पुरवठा व्हावा अशी अपेक्षा आहे. याशिवाय कारवाफा प्रकल्प, तुलतुली प्रकल्प,पोहरा प्रकल्प व खोब्रागडी प्रकल्प या विदेशी कर्ज सहाय्यीत प्रकल्पाचे काम देखील सुरु करण्यात आले होते. परंतू जंगलव्याप्त क्षेत्रातील जमीन उपलब्ध झांली नसल्यामूळे सध्या या पाचही कामात अडचनी निर्माण झाल्या असून शासन स्तरावर मंजूरीसाठी प्रयत्न सुरु आहेत. या पाचही प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यांस 46893 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल अशी अपेक्षा आहे.

6) पशुसंवर्धन वैद्यकीय सेवा व दुग्धव्यवसाय

6.1 पशुधन

1997 चे पशुगणनेनूसार जिल्हयातील एकूण जनावरांची संख्या 972588 इतकी असून त्यापैकी गाई व बैल यांची संख्या 62.92 टक्के म्हणजेच 611934 इतकी आहे. 2.5 वर्षावरील संकरीत गाई व बैल यांची संख्या फक्त 1140 एवढी आहे.म्हशी व रेडे यांची संख्या 95424 (9.81 टक्के) आणि शेळया,मेंढया यांची संख्या 217402 (22.35 टक्के) इतकी आहे. पशुची घनता दर चौ. की.मी. मागे 67 एवढी पडते. हा जिल्हा आदिवासींनी व जंगलाने व्याप्त असल्यामूळे येथे पारंपारीक पध्दतीने कोंबडया पाळल्या जातात.1997 च्या पशुगणनेनूसार जिल्हयांतील कुक्कुटपक्षांची संख्या 1015628 इतकी आहे. गडचिरोली येथे शास्त्रियं पध्दतीने व व्यापारी तत्वावर कुक्कुटपालन केंद्र सुरु करण्यात आले आहे.

6.2 पशुउत्पादन व दुग्ध उत्पादन

जिल्हयात संकलीत होणारे दुध शासकीय योजनेमार्फत प्रक्रीया होऊन विकले जाते. आलापल्ली व कन्हेरी येथे पुर्विचे स्थापीत करण्यात आलेली शितगृहे असतीत्वात आहेत. परंतू दुधाचे उत्पादन कमी असल्यामूळे आलापल्ली येथील शितगृह बंद आहे. जिल्हयात गडचिरोली व वडसा (देसाईगंज) या शहरांचा आजूबाजूचा परिसर वगळता दुग्धव्यवसाय विकासित नाही. जिल्हयात एकूण 107 दुग्ध सहकारी संस्था असून त्यातील सभासद संख्या 8130 इतकी आहे. प्रतीदीन 1800 लिटरच्या सरासरीने 2000-2001 या वर्षात 650 हजार लिटर इतके दुध संकलित करण्यात आले. जिल्हयात 2000-2001 या वर्षामध्ये मान्यता प्राप्त अशी एकूण 2 पशुवधगृहे सुरु असून त्यामध्ये 1318 शेळयाची कत्तल करण्यात आली. डूकरांची कत्तल करण्याकरिता मान्यता प्राप्त कत्तलखाने नसून ते इतरत्र कत्तल केल्या जातात. याशिवाय जिल्हयातील अनेक भागात शेळयांची कत्तल होत असून त्यांची आकडेवारी उपलब्ध नाही.

6.3 पशुवैद्यकीय सेवा

2000-2001 या वर्षात जिल्हयामध्ये 1 पशुवैद्यकीय चिकीत्सालय 90 पशुवैद्यकीय दवाखाने, 44 पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्र व 8 फिरती पशुवैद्यकीय दवाखाने 1 दक्षतापथक कार्यरत आहे. तसेच जिल्हयामध्ये 117 कृत्रिम रेतन केंद्र आहेत. सुधारीत जातीच्या जनावरांची पैदास जास्त प्रमाणात व्हावी या उद्येशाने कृत्रिम रेतन केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. वडसा येथे पशुपैदास केंद्र देखील सुरु आहे. 2000-2001 या वर्षाचे आकडेवारी नुसार 254413 जनावरांवर उपचार करण्यात आला. 557968 जनावरांना लसी टोचण्यात आल्या असून 31018 जनावरांचे खच्चीकरण करण्यात आले. कृत्रिम गर्भधारण केलेल्या जनावरांची संख्या 11760 इतकी असून त्यापैकी संकरित वासरांची संख्या 909 इतकी आहे.

6.4 पशुसंवर्धन विकास व त्यांची प्रगती

जिल्हयातील पावसाचे जास्त प्रमाण, जंगले व नैसर्गिक रित्या असलेली चा-यांची मुबलकता यांचा विचार करता येथे पशुसंवर्धन हे चांगल्या त-हेने प्रगती करु शकते. परंतू जंगल व्याप्त प्रदेश, निरक्षरतेचे मोठे प्रमाण, परंपरागत अंधश्रध्दा,कर्ज परतफेडीची उदासिनता, दळणवळणाची तुटपूंजी व्यवस्था यामूळे पशुधनांचा आधुनिक दृष्टिकोन अजूनही जनतेत आला नाही. तथापी शासकीय योजनेद्वारे परिस्थितीवर मात करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

दुग्ध संकलनाचेही प्रयत्न सुरु असून स्थापीत शितकरण केंद्र पुर्ण क्षमतेत चालविता आली पाहीजे त्यादृष्टिने प्रयत्न सुरु असून त्यात भाकड व गाभन म्हशीचा पुरवठा करणे, देशी गाईचे वाटप करणे, दुर्बल घटकातील कुटूंबांना प्रशिक्षण कार्यक्रम व एक वर्ष वयाच्या उच्च क्षमतेच्या पारडयांचा पुरवठा इत्यादी योजना शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत.

7) मत्स्योत्पादन

7.1 मत्सोत्पादनासाठी गडचिरोली जिल्हयामध्ये 2000-2001 या वर्षात 7504 हेक्टर जल क्षेत्र उपलब्ध असून मत्स्य व्यवसायासाठी उपयोगात आणलेले क्षेत्र 6040 हेक्टर आहे. जिल्हयातून वाहना-या प्रमूख नदया देखील मत्स्योत्पादनासाठी उपयुक्त आहेत. मास्यांचे उत्पादन वाढवून त्यायोगे फायदेशीर व्यवसाय उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने जिल्हयात एकूण 88 मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था असून त्यांची सभासद संख्या 8710 इतकी आहे.

सदर वर्षामध्ये 1996 मे. टन इतके मासे पकडण्यात आले असून त्याची किंमत 593 लाख रुपये इतकी आहे. तसेच मत्स्य व्यवसाय क्षेत्रासाठी 102.00 लाख मत्स्य बिज पुरविण्यात आले असून, त्यात 1999-2000 च्या तुलनेत घट झालेली आहे.

7.2 मत्स्योत्पादन विकास कार्यक्रम

या कार्यक्रमाखाली राज्य योजनेअंतर्गत अवरुध्द पाण्यात मत्स्य संवर्धन, मत्स्यव्यवसायांचे प्रशिक्षण, मत्स्य विषयक साधन सामुग्रीवर अनुदान यांचा समावेश आहे यात अंशत: केंद्र पुरस्कृत असणा-या मासेमारांचा विमा,मत्स्य संवर्धन विकास यंत्रणा इत्यादी योजना कार्यान्वीत आहेत. शिवाय विशेष केंद्र सहाय्य या केंद्र पुरस्कृत योजनेखाली एटापल्ली तालूक्यातील भामरागडया परिसरातील आदिवासी जातींच्या माडीया व झारीया लोकांना मासेमारीसाठी देखील योजना सुरु आहेत. मुळ मत्स्य व्यवसायासाठी आधनिक साधने पुरविले जातात. तसेच मत्स्य बिज देखील पुरविले जाते. मत्सोत्पादन करण्यासाठी व मत्स्य व्यवसायी कांना प्रवृत्त करण्यासाठी जिल्हयात मत्स्य संवर्धन विकास यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे.

विशेष घटक योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, संजय गांधी योजना इत्यादी योजनांमधुन मासेमारांना अर्थ सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. जिल्हयात मुरखडा व देऊळ गाव येथे मत्स्य बिज निर्मीती करणारे २ केंद्र आहेत.

...वहा...

8) विद्युत

या जिल्हयातील 1679 खेडयांपैकी 2000-2001 या वर्षात 1567 खेडयांना विद्युत पुरवठा करण्यात आला. म्हणजेच जिल्हयात आतापर्यंत 93.33 टक्के विद्युतिकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असले तरी दुर्गम भागात वन जमीनीच्या अडचणीमुळे सौर उर्जेद्वारे विद्युतीकरण झालेले आहे. व पुढे पारंपरिक पध्दतीने करण्याची कार्यवाही सूरु आहे.

2000-2001 या वर्षात 107178 हजार किलो वॅट तास विजेचा वापर करण्यात आला. त्यापैकी घरगुती कामासाठी 39320 (36.69%) व्यापारी कामासाठी व लघु शक्तीसाठी 4564 (4.26 टक्के) औद्योगीक कामासाठी 49410 (46.10 टक्के) सार्वजनिक दिवाबत्तीसाठी 4254 (3.97 टक्के) कृषिसाठी 7440 (6.94 टक्के) व इतर कामासाठी 2190 (2.04 टक्के) हजार किलो वॅट विज वापरण्यात आली.गेल्यावर्षीच्या तुलनेत घरगुती कामासाठी 1.42 टक्के घट, व्यापारी व लघुशक्तीसाठी 9.84 टक्के वाढ,औद्योगीक कामासाठी 4.48 टक्के घट आणि सार्वजनिक दिवाबत्तीसाठी 16.38 टक्के वाढ, इतर कामासाठी 947.8 टक्के वाढ व कृषीसाठी 19.78 टक्के वाढ दिसून येते.

जिल्हयात गडचिरोली,आलापल्ली,जिमलगट्टा व सिरोंचा येथे 66 केव्हीचे व आरमोरी,कुरखेडा,चामोर्शि धानोरा व देसाईगंज येथे 33 केव्हीचे उपकेंद्र आहेत. उपकेंद्रांची उच्च दाबाची विद्युत क्षमता वाढविण्याचे प्रस्तावित आहे.

9) खानकाम व उद्योग

9.1 उद्योग

जिल्हयात नोंदणी झालेल्या कारखान्यांची संख्या 2000 मध्ये 115 होती. त्यापैकी 77 चालू कारखान्यांमध्ये 1104 कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

9.2 खनिज उत्पादन

या जिल्हयातील दोन प्रमूख वैशिष्टे म्हणजे विपूल वनस्पती व दुसरे खनिज संपत्ती होय या दोन्ही संपत्तीचा पुरेपूर उपयोग करता आला तर या जिल्हयाचे सर्व चित्रच बदलू शकते. परंतु घनदाट वन असलेल्या जमिनीच्या पोटातच ही संपत्ती दडलेली असल्यामूळे खानी सुरु करावयाच्या झाल्यास वन संपत्तीचा नाश व वन संपत्तीचे संरक्षण केल्यास खनिज संपत्ती दुर्लभ होईल.

महाराष्ट्रात लोह खनिजाचे साठे फक्त गडचिरोली व सिंदुदूर्ग या जिल्हयात आहेत. एकूण अंदाजीत 236 दशलक्ष टन साठयापैकी गडचिरोली जिल्हयामध्ये 180 लक्ष टन खनिज उपलब्ध असल्याचे आढळले आहे. हे साठे सिरोंचा तहसिलीत सुरजागड,भामरागड व दमकोट,वाढवी या भागात असून ते सर्वात चांगल्या प्रतीचे आहे. आरमोरी तहसिलीतील देउळगांव येथे देखील या खनिजाचे साठे आहेत चुनखडीचे साठे जरी त्या मानाने कमी असले तरी चांगल्या प्रतीचे असून त्याचा उपयोग सिमेंट तयार करण्यासाठी होऊ शकतो. अशाच प्रतीचे साठे अहेरी तहसिलीमधील देवलमारी व कोतेपल्ली येथे आणि सिरोंचा तहसिलीमध्ये विरीगुट्टाम कोडा, मश्चिगुडा,उमानुर व अंकिसा या भागात विखुरलेले आहेत.

या शिवाय क्वार्टस व सिलोमानाईट ही खनिजे देखील आहेत पांढ-या व शुभ्र रंगाच्या क्वार्टशचे मोठे साठे चामोर्शि तहसिलीमध्ये घोट या गावाजवळ उपलब्ध असून थोड़या प्रमाणात ते आलापल्ली जवळ देखील आढळतात परंतू आलापल्ली जवळील साठे दुधी रंगाचे आहे. या क्वार्टजचा दगडाचा उपयोग काच तयार करण्यासाठी होतो. सिलीमोनाईट या खनिजाचे साठे देखील आलापल्ली जवळ आढळून येतात.

9.3 महाराष्ट्रामध्ये नव्याने निर्माण करण्यात आलेल्या या जिल्हयात औद्योगीकरण नगन्य आहे. जिल्हयात आष्टी येथे बल्लारपूर इंडस्ट्रिजचा मोठा कारखाना नव्याने स्थापन करण्यात आला असून त्यात 436 कामगार आहे. वडसा येथे पोरवाल पपरमिल हा मध्यम आकाराचा कारखाना अस्तित्वात असून उत्पादन प्रक्रीया सध्या बंद आहेत. लघु उद्योग क्षेत्रात या जिल्हामध्ये वडसा येथे लाहेरी फर्टीलायझरचा कृषिधन खत कारखाना स्थापन करण्यात आला असून त्याची क्षमता 20.00 मे. टन आहे. याशिवाय इतरहि लघुद्योग असून त्यामध्ये प्रामुख्याने भात गिरण्यांचा समावेश आहे. विटा व कौले बनविणारे तीन उद्योग या जिल्हयात असून सिमेंट,पाईप व जाळया बनविणारे दोन उद्योग आहेत. तेलघाणी,मिरची दळण व स्टिल फेब्रीकेशन इत्यादी उद्योग आहेत हे उद्योग मुख्यत्वे करुन गडचिरोली, देसाईगंज, आरमोरी या भागात किंवा त्यांचे असपास आहे. या सर्व उद्योगामुळे 900 ते 950 कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच दर लाख लोकसंख्येमागे चालू असलेल्या कारखान्याची संख्या 11.86 इतकी पडते.

9.4 औद्योगीक वसाहत

गडचिरोली जिल्हयात जिल्हा मुख्यालयाचे ठिकाणी प्रशासकीय संकूलाच्या शेजारी औद्योगीक वसाहत स्थापन करण्यात आली आहे. ही वसाहत 83.81 हेक्टर जागेत विकसीत करावयाची असून त्यापैकी 80.53 हेक्टर क्षेत्र ताब्यात घेण्यात आले आहे. यात विकसीत करण्यात आलेल्या 25 प्लाटपैकी 21 प्लाट वितरीत करण्यात आले असून फेब्रीकेशन कन्फेक्शरी व प्लोट्रीन टाईल्स इत्यादी प्रत्येकी 1 असे 3 उद्योग सुरु करण्यात आले आहेत. तसेच अहेरी येथे 12.30 हेक्टर जागेत औद्योगीक वसाहत स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय इतर तहसिलीच्या ठिकाणीसुध्दा औद्योगीक वसाहत स्थापन करण्याचे प्रस्तावीत आहे.

10) रेल्वे वाहतूक व दळणवळण

10.1 लोहमार्ग

जिल्हयात दक्षिण पूर्व रेल्वे अंतर्गत वडसा (देसाईगंज) व अरुणनगर हे दोन रेल्वे स्टेशन असून रेल्वे गाडी चंद्रपूर जिल्हयातून चंद्रपूर स्टेशनवरुन निघुन गडचिरोली जिल्हयातील वडसा (देसाईगंज) व अरुणनगर या रेल्वे स्टेशनवरुन पुढे गोंदीयाकडे जाते. जिल्हयातील रेल्वे मार्गाची लांबी 18.46 कि.मी. असून नॅरोगेजचे मिटरगेजमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. चंद्रपूर ते गोंदीया पर्यंत नियमित वाहतूक सुरु आहे. तेंदूपानाची फार मोठया प्रमाणात रेल्वेने वाहतूक करण्यात येते.

10.2 रस्त्याची लांबी

राज्यशासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हापरिषद अंतर्गत 31.3.2001 अखेर 6070 कि.मी. लांबीचे रस्ते या जिल्हयात आहेत. 31.3.2000 अखेर हीच लांबी 4843 कि.मी. इतकी होती म्हणजेच 2000 च्या तुलनेत 2001 या वर्षी रस्त्यांच्या लांबीत 1227 कि.मी. इतकी वाढ झालेली आहे. एकूण 6166 कि.मी.लांबीच्या रस्त्यापैकी शासनाच्या बांधकाम विभागाचे 2488 कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. तर जिल्हापरिषद अंतर्गत 3582 कि.मी.लांबीचे रस्ते आहेत. एकूण लांबीपैकी 2339 कि.मी. लांबीचे खडीचे पक्के रस्ते आहेत. तर 1580 कि.मी.लांबीचे इतर माल वापरुन तयार केलेले रस्ते आहेत. तसेच 2145 कि.मी. लांबीचे डांबरी रस्ते आहेत. गेल्यावर्षीचे तुलनेत पृष्ठभोगानूसार डांबरी रस्त्याची लांबीत 10.96 टक्के वाढ व खडीचे पक्क्यां रस्त्यांचे लांबीत 5.69 टक्के वाढ झालेली आहे व इतर माल वापरुन तयार केलेल्या रस्त्यांच्या लांबीत 183.21 टक्केनी वाढ झाल्याचे आढळते. याशिवाय जिल्हयात 96.00 कि.मी. लांबीचे नगरपालीका हदीतील रस्ते आहेत.

जिल्हयातील 100 चौ.कि.मी. ला रस्त्यांचे प्रमाण 42.78 कि.मी.पडते. जिल्हयात महाराष्ट्र परिवहन मंडळांच्या 162 बस गाडया असून रस्त्यावर धावणा-या सरासरी 161 आहेत. मागील वर्षीच्या तूलनेत संदर्भिय वर्षात 5 बस गाडया वाढल्या आहेत. जिल्हयाचा विस्तार लक्षात घेता अस्तित्वात असलेले रस्ते फार अपूरे असून रस्ते व दळणवळणाची साधने हीच या जिल्हयाची मोठी उणिव आहे. बहूसंख्य खेडी रस्त्याने जोडली गेली नसल्याने, जिल्हयाचा दक्षिण पुर्व सिमेवरील भामरागडचा पलिकडील भाग सिरोंचा तालूक्यातील रेगुंटा भाग, धानोरा तालूक्यातील पेंढरीचा भाग अजूनही पावसाळयात दुर्गम राहतो. विशेषकृती कार्यक्रमअंतर्गत रस्ते बांधणीच्या कामावर विशेष भर देण्यात आला आहे.

10.3 नोदणी झालेली वाहने

31.3.2001 अखेर जिल्हयात एकूण 16263 वाहनांची नोंद झाली असून त्यापैकी 76.96 टक्के मोटर सायकली व स्कुटर्स, 4.50 टक्के मोटारी व जिप्स, 2.40 टक्के माल मोटारी व 16.14 टक्के इतर वाहने आहेत. गेल्या वर्षीचें तुलनेत यावर्षी 16.21 टक्के वाहने वाढली आहेत.

10.4 टपाल व तार कार्यालये

जिल्हास्तरावरील डाक विभाग व तार विभागाची प्रमूख कार्यालये चंद्रपूर येथे आहेत. जिल्हयात समालोचनाचे वर्षी 185 डाकघरे असून तारघरांची संख्या मात्र 7 इतकी आहे. दर लाख लोक संख्येमागे 19.07 डाकघरे व 100 टपाल पेटया आहेत. 1 एप्रिल 2002 पासुन गडचिरोली जिल्हयात मुख्य टपाल कार्यालय सुरु करण्यात आलेले आहे.

10.5 दुरध्वनी व दुरदर्शन संच

जिल्हयात गडचिरोली व देसाईगंज (वडसा) येथे दोनच मोठया म्हणता येतील अशा टेलिफोन एक्चेंज आहेत. जिल्हयातील एकूण 8472 दुरध्वनीपैकी निम्म्यापेक्षा अधिक टेलिफोन धारक गडचिरोली व देसाईगंज येथील आहेत. बहुतेक तहसिल मुख्यालये व जिल्हयातील मुख्य गावे टेलिफोननी जोडलेली आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत टेलीफोनच्या संख्येत 53.87 टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

जिल्हयात 1987-88 मध्ये दुरदर्शन केंद्र सुरु करण्यात आले. जिल्हयामध्ये दरचित्रवाणीची सोय उपलब्ध करुन देण्यात आली असून, दूरचित्रवाणीद्वारे ग्रामिण जनतेला ज्ञान मिळण्याचे दृष्टिने शासनातर्फे काही ग्रामपंचायतीना अनुदानतत्वावर सामुहीक दुरदर्शन संच पुरविण्यात आले आहेत. शासनाने वाटप केलेल्या दुरदर्शन संचाची 2000-2001 अखेरीस संख्या 259 इतकी आहे. हे दुरदर्शन संच ग्रामपंचायती व शाळेत बसविण्यात आलेली आहेत. अहेरी व सिरोंचा येथे दुरदर्शन केंद्र उघडण्यात आले आहे.

11) कामगार व रोजगार

11.1 रोजगार विनीमय केंद्रांचे आकडेवारीवरुन असे दिसून येते की, 279 आस्थापना मधुन जिल्हयातील निरनिराळया उपयोगांमध्ये मार्च, 2001 अखेर 21899 कामगार असून 10418 शासकीय, 8229 निमशासकीय व 3252 खाजगी क्षेत्रामध्ये आहेत. म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रामध्ये 85.15 टक्के व खाजगी क्षेत्रामध्ये 14.85 टक्के रोजगार आहेत. 2000 मध्ये पटावरील अर्जदारांची संख्या 46411 इतकी आहे.

11.2 रोजगार विनिमय केंद्रातील आकड़ेवारी वरुन असे स्पष्ट होते की, संदर्भिय वर्षात व्यवसायांचा राष्ट्रीय वर्गीकरणानूसार 6579 उमेदवारांनी काम मिळविण्यासाठी आपली नावे नोदवीली होती. त्यापैकी फक्त 250 उमेदवारांना रोजगार मिळाला. त्यात 54.40 अनुसूचित जाती-जमातिची व 45.60 टक्के इतर वर्गाचे उमेदवार होते. मागील वर्षाच्या तूलनेत 2000 या वर्षी रोजगार मिळालेल्या उमेदवारांच्या संख्येत 318 ने घट झालेली आहे.

नोकरीसाठी अर्ज करणा-या उमेदवारांच्या संख्येत दरवर्षी झपाटयाने वाढ होत आहे. परंतू नोकरी मिळण्याचे प्रमाण उत्तरोत्तर कमी झाल्याचे दिसून येते. बेरोजगारीवर उपाय म्हणून शासनाद्वारे रोजगार हमी योजना कार्यक्रम राबविण्यात येत असला तरी जिल्हयात मोठे उद्योग निर्माण केल्यास बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध होईल.

11.3 कृषि व बिगर कृषि आस्थापना

जिल्हयामध्ये कृषि व बिगर कृषि उद्योगांची संख्या 33183 आहे. त्यापैकी 82.72 टक्के आस्थापना ग्रामीण भागात तर केवळ 17.28 टक्के आस्थपना नागरी भागात कार्यरत आहेत. एकूण आस्थापनापैकी 27406 (82.59) खाजगी तर 475 (1.83) आस्थापना सहकारी क्षेत्रात व 5302 (15.98) सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत आहेत. एकूण आस्थापनेच्या 8.92 टक्के आस्थापनांचे मालक अनु.जातीचे तर केवळ 15.77 टक्के आस्थापनांचे मालक अनु. जमातीचे आहेत. एकूण आस्थापनापैकी 14.45 टक्के आस्थापना जागा विरहीत कार्यान्वीत होते. तर केवळ 10.81 टक्के आस्थापनेमध्ये उत्पादनासाठी विजेचा वापर करण्यांत येत होता.

11.4 कामगार

कृषि व बिगर कृषि आस्थापनामध्ये 68847 कामगार काम करीत होते. त्यापैकी 75.28 टक्के कामगार ग्रामीण भागात तर 24.72 टक्के कामगार नागरी भागात काम करीत होते. एकूण कामगारापैकी वेतनाधर काम करणारे कामगार 34070 (49.49) होते. जिल्हयातील प्रत्येक आस्थापनेत सरासरी 2 कामगार काम करीत होते. तर ग्रामीण व नागरी भागातील आस्थापनेकरिता हेच प्रमाण 2 व 2 असे होते.

11.5 उद्योग गटानुसार वर्गीकरण

प्रत्येक उद्योग गटात किती कामगार काम करीत होते, याची गटवार माहीती या प्रकाशनातील तक्ता क्र. 5.12 मध्ये देण्यांत आली आहे. एकूण आस्थापनापैकी सामुहीक, सामाजिक व व्यक्तीगत सेवा या उद्योग गटात सर्वाधिक म्हणजे 9168 (27.63) आस्थापना होत्या व त्यामध्ये एकूण कामगारपैकी 11006 (15.99) कामगार काम करीत होते. किरकोळ व्यापार या उद्योग गटाचा दुसरा क्रमांक लागतो. त्यामध्ये एकूण 8744 (26.35 %) आस्थापना होत्या. कामगार संख्येच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास या आस्थापनेमध्ये 13079 (19.00 %) कामगार काम करीत होते. वस्तु निर्माण या उद्योग गटात 4105 (12.37 %) आस्थापना होत्या. या आस्थापनेमध्ये 7464 (10.84 %) कामगार काम करीत होते. कृषि उद्योग गटात 7942 (23.93 %) आस्थापना होत्या. या आस्थापनेमध्ये 10024 (4.56 %) कामगार काम करीत होते. उर्वरित उद्योग गटातील 3224 (9.72 %) आस्थापनेमध्ये 27274 (39.62) गुंतलेले होते.

12) सहकार

12.1 ग्रामीण जनतेचे जिवनमान उंचावण्यासाठी व शेती व्यवसायीकांच्या अडचणी भागविण्यासाठी सहकार चळवळीचे मोलाचे योगदान आहे. शासनाद्वारे सहकार क्षेत्रात अनेक रोजगार योजना राबविण्यात येत आहेत. 2000-01 यावर्षी जिल्हयात सर्वप्रकारच्या मिळून 740 सहकारी संस्था आहेत. या सहकारी संस्थांची सभासद संख्या 162 हजार इतकी आहे. सहकारी संस्थांपैकी 260 सहकारी पत संस्था आहेत. तर बिगर कृषि पत संस्थांची संख्या 80 इतकी आहे. या पतसंस्थांमध्ये प्रामुख्याने कृषिपत संस्थाचा समावेश असून त्यांचे प्रमाण एकूण सहकारी पत संस्थांचा 53.46 टक्के इतके होते. प्रामुख्याने भात पिकविणारा हा जिल्हा असल्यामूळे सहकारी भात गिरण्यादेखील आहेत. सहकारी कृषि प्रक्रीया संस्थांची संख्या 5 एवढी आहे. वन व्याप्त प्रदेश बराच मोठा असल्यामूळे वनोत्पादनाशी संबंधित असणा-या 30 संस्था अस्तित्वात आहेत. तसेच दुग्ध संस्था 108, मत्स्य व्यवसाय 88 व गृहनिर्माण संस्था 38 आहेत.

एकूण 740 संस्थांचे भरणा झालेले भाग भांडवल 133054 हजार रुपये असून त्यांचा स्वताचा निधी 15628 हजार रुपये इतका आहे. या संस्थेकडे 31.3.2001 अखेर 990917 हजार रु. ठेवि असून त्यांचे खेळते भांडवल 1566912 हजार रुपयं एवढे आहे. 31.3.2000 अखेर खेळते भांडवल 1566912 हजार रुपये इतके होते. 31.3.2001 अखेर एकूण 186 संस्थांना 24536 हजार रुपये एवढा नफा झाला. तोटयात चालना-या संस्थांची संख्या 422 इतकी असून त्यांचा तोटयांची एकूण रक्कम 18595 हजार रुपये इतके आहे. ना नफा ना तोटा असणा-या सहकारी संस्थांची संख्या 31.3.2001 अखेर 132 इतकी आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक हाच एकमेव सहकारी क्षेत्रातील बॅकिंगचा मुख्य स्तोत्र आहे. 31.3.2001 अखेर जिल्हयातील प्राथमिक कृषि सहकारी पत संस्थांनी 23864 हजार रुपये 17414 कर्जदारांना वाटप केले तसेच एकूण कर्जाची थकबाकी 91389 हजार रुपये 15794 कर्जदारांकडे थकीत असल्याचे आढळते त्यापैकी तीन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या कर्जाची थकबाकी 74857 हजार रुपये 5265 कर्जदारांकडे व 3 वर्षापेक्षा अधिककालावधीचा कर्जाची थकबाकी 16532 हजार रुपये 10529 कर्जदारांकडे असल्याचे आढळते.

13) अधिकोष

13.1 गडचिरोली जिल्हा बॅकीग व्यवसायांचे प्रमाण फारच अल्प असल्याचेआढळून येते. जिल्हयातील 42 गावात 5 वर्गीकृत बॅकांची 44 कार्यालये आहेत. 31.3.2001 अखेर त्यांचा एकूण ठेवी 25458 लाख रुपये तर आगाऊ रक्कमा 10581 लाख रुपये आहेत. राष्ट्रीयकृत बॅकांमार्फत कुटूंब विकास कार्यक्रमांतर्गत कृषि व लघु उद्योग व इतर उद्योगांना कर्ज पुरवठा करण्यात येतो. 1999-2000 या वर्षिच्या तुलनेत 2000-2001 या वर्षात वर्गीकृत अधिकोषांचे संख्येत वाढ अथवा घट झालेली नाही.

13.2 बॅकांच्या दर शाखेमागे लोकसंख्येचे प्रमाण

या जिल्हयात 2000-2001 वर्षाअखेर 22045 लोकसंख्येमागे एक व्यापारी अधिकोष व 28394 लोकसंख्येसाठी एक सहकारी अधिकोष असे प्रमाण पडते या जिल्हयात गडचिरोली वडसा (देसाईगंज), अहेरी व आलापल्ली या नागरी क्षेत्रात एकूण 16 बॅक कार्यालये असून गडचिरोली व वडसा (देसाईगंज) या नगरपरिषद क्षेत्रात 10 बॅक कार्यालये आहेत. आदिवासी क्षेत्रात 17000 लोकसंख्येमागे एक राष्ट्रियकृत बॅक शाखा उघडण्याचे धोरन असून त्यानुसार नविन बॅकांचे शाखा उघडण्याचे प्रयत्न सरु आहेत.

14) बाजारभाव

14.1 घाऊक बाजारभाव

कृषि व्यवस्था ही जिल्हयातील प्रमुख पिक भात यावरच अवलंबून आहे. त्या पिकाच्या उत्पादनाच्या व त्यापासून मिळणा-या किंमतीचा सरळ परिमाण या भागातील अर्थ व्यवस्थेवर होतो. 2000-2001 या सहकारी वर्षात अतिउत्तम भाताचे भाव प्रती क्विंटल 705 रुपये होते. मध्यम व हलक्या प्रतीच्या भाताचे भाव अनुक्रमे 586 व 472 रुपये प्रती क्विंटल असे होते. अती उत्तम प्रतीच्या भाताचे हेच भाव 1999-2000 करिता रुपये 783 प्रती क्विंटल व उत्तम प्रतीच्या जातीकरिता 606 व मध्यम प्रतीच्या जातीकरिता रुपये 494 प्रती क्विंटल असे होते. यावरुन असे दिसून येते की, मागील वर्षीच्या तुलनेत भाताच्या किंमतीत 2000-2001 या सहकारी वर्षात 6.37 टक्केने घट झालेली आढळते.

ज्वारी हे जिल्हयातील गौण पिक समजले जाते. 2000-2001 या सहकारी वर्षात पिकांच्या सरासरी घाऊक बाजार भावांकडे दृष्टिक्षेप टाकला असता ज्वारीचे सरासरी बाजारभाव 506 रुपये प्रती क्विंटल होते. म्हणजेच ज्वारीच्या बाजार भावात 1999-2000 च्या तुलनेत 4% घट झालेली दिसून येते.

द्विदल धान्यापैकी तूर व मुग ही पिके प्रामूख्याने घेतली जातात. तुरीचे पिक मुख्य जमिनीवर न घेता भात खाचराच्या बांध्यावर घेतले जाते. समालोचनाच्या वर्षी या दोन्ही धान्यांचे सरासरी घाऊक बाजार भाव 1318 रुपये व 1538 रुपये प्रती क्विंटल असे आहेत. त्यापैकी तुरीच्या भावात 1999-2000 च्या तुलनेत 5.24 टक्केने घट व मुगाच्या भावात 5.34 टक्क्यानी वाढ झाल्याचे दिसून येते.

जिल्हयामध्ये जवस व तिळ यांचे पिक तेलबिया म्हणून प्रामूख्याने घेतले जाते त्यांचे भाव अनुक्रमे 1480 रुपये व 1748 प्रती क्विंटल असे आहे. 1999-2000 वर्षाच्या तूलनेत जवसाचे घाऊक किंमतीमध्ये 10 टक्केने घट व तिळाचे घाऊक किंमतीत 5 टक्केने वाढ झाल्याचे दिसून येते.

14.2 किरकोळ बाजार भाव

गडचिरोली या जिल्हयात मुख्यालयाच्या ठिकाणी जिवनोपयोगी वस्तूंचे किरकोळ बाजारभाव माहे जुलै 1998 पासून संकलीत करण्याची योजना कार्यान्वीत झाली असून 2000 मध्ये जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणाच्या जिवनावश्यक वस्तूंच्या सरासरी किरकोळ किंमतीचा दर, किलो मागे पूढीलप्रमाणे आहे.

तांदूळ मध्यम 10.75 रुपये, गहू मध्यम 9.46 रु. बाजरी 9.00 रु. तूरडाळ 27.42 रुपये मसूर डाळ 24.83 रु.,साखर (खु.बा.) 16.00 रु. गूळ 16.00 भूईमूगाचे तेल 45.67 रु. वनस्पती तूप 50.33 रु., म्हशीचे दूध प्रती लिटर 10.00 रु.,बोकडाचे मांस 100.00 रु., मिरची सूकी 40.00 रु. बटाटे 8.00 रु., चहापत्ती 120.00 रु., साडी 110.00 रु., पोलक्याचे कापड 25.00 रु.नग , धुण्याचा साबण 501 बार 1 नग 16.00 रु., सुपारी भरडा किलो 150.00 रु., एकंदरीत मागील वर्षीच्या तुलनेत कांही वस्तूच्या किंमतीत वाढ / घट झाल्याचे आढळते.

14.3 ग्राहक किंमतीचे निर्देशांक

ऑक्टोबर, 1988 प्रासून ग्राहक मूल्य निर्देशांकाचे आधारभूत वर्ष 1982 = 100 असे ठरविण्यात आले आहे. 2000-2001 या वर्षाकरीता नागपूर केंद्रातील कामगारांचे अन्न गटासाठी 439, पानसुपारी व तंबाखू 708, इंधन व दिवाबत्ती 437 कापडबिछाना व पादत्राणे 289, संकीर्ण 485 व साधारण 469 असे सरासरी निर्देशांक आहे.

15) शैक्षणिक सुविधा

15.1 शाळा आणि महाविद्यालये

प्राथमिक शाळांच्या संदर्भात 1998-99 यावर्षी राज्यात 1208 लोकसंख्येला 1 प्राथमिक शाळा तर गडचिरोली जिल्हयात हेच प्रमाण 580 आहे. क्षेत्रात विचार केला तर राज्यात 5 कि. मी. क्षेत्रात 1शाळा तर गडचिरोली जिल्हयात 11 कि.मी. क्षेत्रात 1 शाळा पडते या जिल्हयाची लोकसंख्या विरळ असल्याने शासनाने 200 लोकसंख्येसाठी 1 शाळा हे प्रमाण शिथिल करुन 100 लोकसंख्येसाठी 1 शाळा करण्याचे निश्चित केले आहे. तसेच 1 शिक्षकी शाळेचे द्विशिक्षकी शाळेत रुपांतर करण्यात आले. शासनाचे नविन धोरणानूसार शाळा उघडण्याचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे. आदिवासी भागात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून अनेक योजना राबविण्यात येत आहेत.

जिल्हामध्ये 1999-2000 या वर्षी 1361 पूर्व प्राथमिक शाळा, 973 कनिष्ठ प्राथमिक व 407 वरिष्ट प्राथमिक अशा सर्व शाळा मिळून एकूण 1380 शाळा सुरु होत्या व त्यात एकूण 4283 शिक्षक अध्यापन कार्य करीत होते. या शिक्षकापैकी शिक्षीकांची संख्या 820 इतकी म्हणजे, 19.14 टक्के एवढी होती. तर शाळेत 142211 विद्यार्थी शिक्षण घेत होते. माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांची संख्या 192 असून त्यातील एकूण 2522 शिक्षकांमध्ये स्त्रि शिक्षीकांचे प्रमाण 11.02 टक्के पडते माध्यमिक शाळेतून 83427 विद्यार्थी शिक्षण घेत होते. विद्यार्थी संख्येबाबत विचार केला असता असे दिसते की, 1999-2000 या वर्षी निरनिराळया सर्व शैक्षणिक संस्थांमधून 352079 इतके विद्यार्थी शिक्षण घेत होते त्यापैकी विद्यार्थीनिंची संख्या 167507 म्हणजेच 47.57 टक्के इतकी होती एकूण विद्यार्थ्यापैकी 191348 विद्यार्थी हे मागासवर्गीय म्हणजेच 54.34 टक्के होते. त्यात 88618 इतक्या मुली होत्या म्हणजे एकूण मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी मागासवर्गीय विद्यार्थीनिचे प्रमाण 46.31 टक्के एवढे पडते. जिल्हयातील बहुतेक विद्यार्थी कला व वाणिज्य शाखेशी संबंधित आहेत. गडचिरोली, आरमोरी व अहेरी येथे विज्ञान शाखेची सोय आहे. 1999-2000 या वर्षात सामान्य शिक्षणांची 20 महाविद्यालये असून त्यामध्ये 193 शिक्षक होते.

जिल्हयात कामगार व कामगार कल्याण योजनेतंर्गत प्रत्येक तालूक्यात एक याप्रमाणे 12 औद्योगीक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. त्यांची प्रवेश क्षमता 2108 इतकी आहे. यात एकूण 19 व्यवसाय अभ्यासक्रमातून शिक्षण दिले जाते. अधिक 2 स्तरावर व्यवसाय शिक्षण हे 14 संस्थामधून 2245 विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. यात तांत्रिक गट,वाणिज्य गट, शेतकी गट, पॅरामेडीकल गट व हॉटेल मॅनेजमेंट गट इत्यादी अभ्यासक्रमांची सोय आहे. पास असलेल्या विद्यार्थाना स्वयंरोजगारांसाठी व लघु उद्योगांकरीता वित्तीय संस्था मधून सहाय्य देण्यात येते.

जिल्हयात शासकीय तंत्रनिकेतन ही एक तांत्रिक अभ्यासक्रम देणारी संस्था असून यात स्थापत्य, अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, विधुत आभियांत्रिकी, अणुविधुत व दुरसंचार अभियांत्रिकी असे चार अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम शिकविल्या जातात. यातील प्रवेश क्षमता 210 एवढी असून. संस्थेतील एकूण विद्यार्थी संख्या 496 एवढी आहे.

15.2 इतर शिक्षण विषयक कार्यक्रम

निरक्षरता ही राष्ट्रीय समस्या समजण्यात आली आहे. निरक्षरतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रौढ शिक्षण कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. 1995-96 या वर्षापासून गडचिरोली जिल्हयात साक्षरता अभियान हा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून संदर्भीय वर्षात 13047 वर्ग सुरु करण्यात आले आहे. सदर वर्गात 143541 प्रौढ त्याचः लाभ घेत आहे. वयोगट 9 ते 35 मधील निरिक्षरांचे अक्षरधारा भाग 1, 2, 3 चे कार्यसुरु आहे साक्षरता केंद्राचे बाहय मुल्यमापनाचे कार्य पुर्ण झाले आहे.

16) वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

16.1 वैद्यकीय सेवा

गडचिरोली जिल्हयामध्ये वैद्यकीय सेवा फार मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. खाजगी डॉक्टर्स प्रामूख्याने गडचिरोली व देसाईगंज अशा ठिकाणी आहेत.तथापी त्यातील एम.बी.बी.एस. अथवा एम.डी. किंवा एम.एस. डॉक्टर्स अगदी बोटावर मोजण्या इतके आहेत. बहुसंख्य डॉक्टर्स पदविका धारण करणारे असून त्यात होमीआपॅथीचे, प्रमाणपत्राद्वारे किंवा अन्य प्रकारे पदविका प्राप्त करुन घेऊन व्यवसाय करणारेच अधिक सापडतील त्यामूळे जिल्हा परिषदेचे दवाखाने किंवा शासकीय दवाखाने याशिवाय योग्य अशी वैद्यकीय सेवा जिल्हयात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. जिल्हयात आदिवासी क्षेत्र जास्त असून काही भाग दुर्गम आहे. या भागात लोकवस्ती विरळ आहे.बहुतेक लोक वाडयावरच राहतात. त्यामूळे त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र चे उपकेंद्रातील आरोग्य सेवा उपलब्ध होत नाही. यासाठी या भागात 3000 लोकसंख्येस 1 उपकेंद्र हा निकष शिथील करुन 2000 लोकसंख्येमागे 1 उपकेंद्र स्थापनेचे प्रास्तावित आहे. नुकतीच सर्च या संस्थेद्वारे आरोग्य सेवा सुरु झाली आहे, परंतु ती देखील मर्यादीत स्वरुपात असल्यामुळे तीचा प्रभाव ग्रामीण भागातील धानोरा, चातगाव या भागातच दिसून येतो.

16.2 2000-2001 या वर्षात जिल्हयामध्ये 14 रुग्णालये, 22 दवाखाने व 46 प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत.त्यामधून 177 डॉक्टर्स आणि 626 परिचारीका काम करीत होते. रुग्णालये,दवाखाने व प्राथमिक आरोग्य केंद्रामधून 1198 खाटांची सोय उपलब्ध आहे. त्यापैकी 570 खाटा स्त्रियांसाठी आहेत. 11400 पुरुषांवर, 18200 स्त्रियांवर व 7000 मुलांवर आंतर रुग्ण म्हणून उपचार करण्यात आले. या आरोग्य केंद्र/रुग्णालयात बाहय रुग्णांची संख्या अनुक्रमे 280100, 333600 व 247700 इतकी होती. गडचिरोली येथील सामान्य रुग्णालयात इमारतीचे काम आणि डॉक्टर्स व कर्मचारी निवासस्थानाचे संकुल तयार करण्याचे काम पुर्ण झाले आहे. तेथील रुग्णालयात 200 खाटांची सोय असून सर्व अद्यावत यंत्र सामुग्री बसविण्यात आली आहे व मुख्य तांत्रिक अधिकारी कार्यरत आहे. त्यामुळे जिल्हयातील बहुतेक रुग्ण यात उपचार घेतात.

16.3 कुटूंब कल्याण कार्यक्रम

2000-2001 या वर्षात जिल्हयात एकूण 47 कुटूंब नियोजन केंद्र कार्यरत असून त्या मधून 1965 पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया व 6444 स्त्रियांवर शस्त्रक्रिया अशा एकूण 8409 शस्त्रक्रिया करण्यात आल्या. 1999-2000 या वर्षी हाच आकडा एकूण 6495 एवढा होता. म्हणजेच गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी निर्यीजीकरण केलेल्या संख्येत 29.47 टक्के वाढ झालेली दिसून येते.

जननक्षम जोडप्यांची संख्या 2000-2001 यावर्षी 158287 इतकी असून 1999-2000 या वर्षी जननक्षम जोडप्यांची संख्या 158552 इतकी होती. तसेच लूप पध्दतीचा वापर करण्या-यांची संख्या 4048 असून 1999-2000 या वर्षापेक्षा 0.74 टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

16.4 जन्म-मृत्यु प्रमाण

2000 अखेर नोंदलेल्या जन्मांची संख्या 18036 असून त्यापैकी 9545 पुरुष, 8491 स्त्रिया आहेत. तसेच नोंदलेल्या मृत्यूंची संख्या 5056 असून त्यात 2916 पुरुष व 2140 स्त्रिया आहेत. त्यापैकी बाल मृत्युंची संख्या 393 इतकी आहे. दर हजारी जन्म आणि मृत्यूंचे प्रमाण अनुक्रमे 19.95 व 4.89 टक्के होते. तसेच दर हजारी जिवंत जन्मामागे बाल मृत्युंचे प्रमाण 21.78 टक्के पडते.

17) दुर्बल घटकांचे कल्याण

17.1 सामाजिक एक दुर्बल घटक म्हणजे आदिवासी, 1991 प्रमाणे जिल्हयातील एकूण 1671 गावापैकी 1408 गावे आदिवासी घोषीत करण्यात आले आहेत. त्यातील बहूसंख्य लोकसंख्या आदिवासी असल्यामूळे गडचिरोली जिल्हा हा मूळातच आदिवासी जिल्हा समजल्या जातो. महाराष्ट्रातील इतर जिल्हयाच्या तुलनेत गडचिरोली जिल्हा मागासलेला असल्यामुळे जिल्हयाचा जलद गतीने विकास करुन इतर जिल्हयाचे बरोबरीत आणण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

जिल्हापरिषद, समाजकल्याण, आदिवासी विकास विभाग अणि प्रामुख्याने एकात्मीक ग्रामीण विकास यंत्रनेद्वारे निरनिराळया योजनावर अनुदान, कर्जे इत्यादींची सोय उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. आदिवासी योजनेखाली देखील मोठी तरतूद करण्यात येत व त्या निधीतून वैयक्तीक स्वरुपाच्या व सामूहीक स्वरुपांच्या योजना राबविल्या जातात. सामुहिक योजनांच्या स्वरुपामध्ये मुख्यत्वे करुन रस्ते विकास, विद्युतीकरण, आरोग्यसेवा, सिंचन व शिक्षण यांची प्रामुख्याने आवश्यकता असल्यामूळे या बाबीवर खर्च केला जातो. याशिवाय शेतीसाठी लागणारी खते, दुभती जनावरे व कोंबडया पुरविणे, फळ झाडाचे रोपे, मत्स्य संवर्धनासाठी आवश्यक ते साहित्य पुरविणे इत्यादी योजना कार्यान्वीत केल्या आहेत. घरे बांधण्याचा कार्यक्रम देखील हाती घेण्यात आलेला आहे.

17.2 विस कलमी कार्यक्रमांतर्गत 2000-2001 या वर्षात अनुसूचित जातीच्या 514 कुटूंबाना व अनुसूचित जमातीच्या 709 कुटूंबाना निरनिराळया प्रकारें सहाय्य देण्यात आले. पिण्याचे पाणी ही गंभीर समस्या असून 2000-01 या वर्षात 1431 खेडयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आला. यात टँकरणे 00 गावांना व इतर साधनांनी 72 गावांना पाणी पुरवठा करण्यांत आला. 304 बायोगॅस संयंत्रे बसविण्यात आली व 1600 सुधारीत चूली बसविण्यात आल्या. कुटूंब कल्याण व आरोग्य सेवा यामध्ये देखील कार्य सुरु असून 7056 कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यांत आल्या.

18) संकीर्ण/सर्वसाधारण

18.1 नगरपरिषदा व जिल्हापरिषदा

हा जिल्हा प्रामुख्याने आदिवासी व जंगलाने व्याप्त असा असल्यामूळे येथे नागरी क्षेत्र जवळजवळ नाहीच. जिल्हा स्थापन झाल्याच्या वेळी फक्त एक नगरपरिषद देसाईगंज अस्तित्वात होती. त्यानंतर 1985 साली जिल्हयाचे मुख्यालय असलेल्या गडचिरोली गावी आजूबाजूच्या 5/6 खेडयांच्या अंतर्भाव करुन नगरपरिषद स्थापन करण्यात आली. डिसेंबर, 1992 ला प्रथम नगरपरिषदेची निवडणूक घेण्यात आली. तसेच 1996 मध्ये दुस-यांदा तर डिसेंबर 2001 मध्ये तिस-यांदा नगरपरिषदेची निवडणूक घेण्यात आली आहे.

गडचिरोली व देसाईगंज येथील नगरपरिषदांचे 2000-01 या वर्षातील एकूण उत्पन्न 705 लाख रुपये व खर्च 552 लाख रुपये इतके आहे. त्यातील उत्पन्नात सर्वात मोठा भाग घरे व जमिनीवरील कर यापासून मिळालेला आहे. सर्वात ज्यास्त खर्च सार्वजनिक आरोग्य व सोई याबाबीवर आढळून येतो. 2000-01 या वर्षी गडचिरोली जिल्हापरिषदेचे एकूण उत्पन्न 20270 लाख रुपये आहे. व खर्च 19864 लाख रुपये इतका आहे. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात शासकीय अनुदानाचा भाग मोठा आहे. या जिल्हयात मोठया प्रमाणात जंगल व्याप्त क्षेत्र असल्यामूळे जंगल उत्पादनाच्या आधारावर मिळणा-या अनुदानामूळेच ही जिल्हा परिषद सुस्थितीत आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. त्याशिवाय गृहकर, पाणीपट्टी व नेहमीच्या करापासून मिळणारे उत्पन्न देखील आहे. जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या तलाव्राच्या दिल्याजाणा-या ठेक्यापासून मिळणारे उत्पन्न देखील नजरेआड करता येण्यासाठी नाही. खर्चाची बाजू विचारत घेतली असता प्रमूख खर्च सार्वजनिक स्वरुपाची बांधकामे, शिक्षण, आरोग्य व स्वच्छता या बाबीवर केला जातो. जिल्हयात एकूण 467 ग्रामपंचायती असून त्यांचे उत्पन्न 282 लाख रुपये व खर्च 257 लाख रुपये इतके आहेत. ग्राम पंचायतीच्या उत्पन्नात प्रामुख्याने कर शुल्क व अनुदान/ अनुदाने इत्यादीचा समावेश आहे. तर आरोग्य, प्रशासन, सार्वजनिक बांधकाम यावर अधिक प्रमाणात खर्च झाल्याचे आढळते.

18.2 जिल्हा राजस्व

या जिल्हयात 2000-01 या वर्षी 229 हजार रुपये जमीन महसूल प्राप्त झाला. त्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत घट झालेली आहे. तसेच खातेदारांची संख्या 133991 इतकी आहे.

18.3 घरबांधणी योजना

गृह निर्माण मंडळामार्फत कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी व मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी जिल्हा स्तरावर योजना राबविण्यासाठी पुर्व तयारी झाली असून घरकुल योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, विस कलमी कार्यक्रम इत्यादीद्वारे राबविण्यात येत आहेत.

18.4 पोलीस व गुन्हे

जिल्हयात 2000-01 वर्षात 28 पोलीस ठाणी व 25 आऊट पोस्ट आहेत. तसेच पोलीस कोठडयांची संख्या 21 एवढीच आहे. 2000-01 या वर्षात पोलीस दलांची संख्या 4518 एवढी आहे. 1999 मध्ये निरनिराळया गुन्हयाखाली दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या 5240 इतकी होती. ती सन 2000 मध्ये 4287 इतकी आहे. म्हणजेच 2000 मध्ये गुन्हयांच्या संख्येत 18.18 टक्के घट झाली आहे.

18.5 अग्निशमन सेवा

गडचिरोली येथे नगर परिषदेची अग्निशमन सेवा 1986-87 वर्षात सुरु झाली. तसेच नगर परिषद देसाईगंज येथे सुध्दा अग्नीशमन सेवा सुविधा उपलब्ध आहे.

18.6 करमणूक

या जिल्हयात 2000-01 या वर्षी कायम स्वरुपाची फक्त 7 चित्रपट गृहे असून फिरत्या चित्रपट गृहांची संख्या 4 आहे. कायम स्वरुपाच्या चित्रपट गृहामध्ये 3981 प्रेक्षकांची बसण्याची सोय आहे. याशिवाय 4 फिरती चित्रपट गृहे व 44 सरकारमान्य व्हीडीओ केंद्र यातील प्रत्येक प्रेक्षकांसाठी आसन क्षमता अनुक्रमे 1600 व 1935 इतके आहे या सर्वापासून 23.90 लाख रुपये करमणूक कर प्राप्त झाला.

18.7 गडचिरोली येथे 1989-90 वर्षात स्टेडीयम उभारण्यात आले असून जिल्हास्तरावरील सर्व सांस्कृतीक कार्यक्रम व विविध खेळांच्या स्पर्धा आयोजीत केल्या जातात.

भाग - 3

तक्ते

जिल्हा-गडचिरोली

2000-2001

तक्ता क्रमांक 1.1

जनगणनेनुसार तालुकावार क्षेजफळ, घरे, व लोकसंख्या

जिल्हा- गडचिरोली

अ. क्रं.	तहसिल	बाब	क्षेत्र चौ. कि. मी.	दर चौ. कि. मध्ये लोक-संख्या	गांवे संख्या		शहरे संख्या	आकडे हजारात				
					वस्ती अस-लेली	ओसाड		वापरा तील निवास गृहे संख्या	कुटुंबे संख्या वस्ती अस-लेली	लोकसंख्या		
										एकूण	पुरुष	स्त्रिया
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
1	गडचिरोली	एकूण	773.40	163	109	13	1	21	22	126293	63960	62333
		ग्रामीण	744.30	113	109	13	0	15	15	83829	42198	41631
		नागरी	29.10	1459	0	0	1	7	7	42464	21762	20702
2	आरमोरी	एकूण	1278.42	71	91	12	0	16	16	90841	45769	45072
		ग्रामीण	1278.42	71	91	12	0	16	16	90841	45769	45072
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
3	कुरखेडा	एकूण	1495.97	52	119	9	0	12	13	77923	39617	38306
		ग्रामीण	1495.97	52	119	9	0	12	13	77923	39617	38306
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
4	धानोरा	एकूण	1950.33	40	217	11	0	12	12	77353	39150	38203
		ग्रामीण	1950.33	40	217	11	0	12	12	77353	39150	38203
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
5	एटापल्ली	एकूण	3954.70	18	188	9	0	10	10	70641	35784	34857
		ग्रामीण	3954.70	18	188	9	0	10	10	70641	35784	34857
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
6	सिरोंचा	एकूण	872.30	80	120	28	0	11	13	69769	34984	34785
		ग्रामीण	872.30	80	120	28	0	11	13	69769	34984	34785
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
7	अहेरी	एकूण	2723.74	38	158	26	0	16	17	103502	52263	51239
		ग्रामीण	2713.41	38	158	26	0	12	13	103502	52263	51239
		नागरी	10.33	0	0	0	0	4	4	0	0	0

तक्ता क्र. 1.1पुढे सुरू

तक्ता क्रमांक 1.1

जनगणनेनुसार तालुकावार क्षेत्रफळ, घरे, व लोकसंख्या

जिल्हा- गडचिरोली

अ. क्र.	तहसिल	बाब	क्षेत्र चौ. कि. मी.	दर चौ. कि. मध्ये लोक-संख्या	गांवे संख्या		शहरे संख्या	आकडे हजारात				
					वस्ती अस-लेली	ओसाड		वापरा तील निवास गृहे संख्या	कुटुंबे संख्या वस्ती अस-लेली	लोकसंख्या		
										एकूण	पुरुष	स्त्रिया
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
8	चामोर्शी	एकूण	1023.31	162	182	22	0	23	28	165511	83899	81612
		ग्रामीण	1023.31	162	182	22	0	23	28	165511	83899	81612
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
9	देसाईगंज	एकूण	192.48	396	30	6	1	13	13	76145	38668	37477
		ग्रामीण	165.78	310	30	6	0	9	9	51359	25982	25377
		नागरी	26.70	928	0	0	1	4	4	24786	12686	12100
10	कोरची	एकूण	555.99	73	126	7	0	6	6	40718	20333	20385
		ग्रामीण	555.99	73	126	7	0	6	6	40718	20333	20385
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
11	भामरागड	एकूण	449.77	70	110	18	0	4	5	31664	16155	15509
		ग्रामीण	449.77	70	110	18	0	4	5	31664	16155	15509
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
12	मुलचेरा	एकूण	163.39	242	66	2	0	7	7	39600	20227	19373
		ग्रामीण	163.39	242	66	2	0	7	7	39600	20227	19373
		नागरी	0.00	0	0	0	0	0	0	0	0	0
एकुण जिल्हा		एकूण	15433.80	63	1516	163	2	152	163	969960	490809	479151
		ग्रामीण	15367.67	59	1516	163	0	137	147	902710	456361	446340
		नागरी	66.13	1017	0	0	2	14	15	67250	34448	32802

टिप - (1) आकडे पुर्णांकात दिल्याने बेरजा जुळणार नाही. (2) रकाना क्र.9 व 10 ची आकडेवारी 1991 च्या जनगणनेनुसार आहे. उर्वरीत आकडेवारी जनगणना 2001 नुसार आहे. (3) सदर आकडेवारी अस्थायी असून पुर्ताल पडताळणीच्या आधीन आहे (4) रकाना क्र.4 ची आकडेवारी जनगणना 1981 (जुन्या चंद्रपूर जिल्हयातील गडचिरोली व सिरोंचा तालूका) नुसार आहे. त्यानंतर निर्मीत तालूक्यांचे क्षेत्रफळ त्यात समाविष्ट गावांच्या क्षेत्रफळांची बेरीज करुन काढण्यात आली आहे.

आधार :- 2001 जनगणना प्रकाशन.

तक्ता क्रमांक 1.2

1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्येचे आकडे हजारात)

अ. क्र.	तहसिल	वर्ष	एकूण व्यक्ती			पुरुष			स्त्रिया		
			एकूण	ग्रामीण	नागरी	एकूण	ग्रामीण	नागरी	एकूण	ग्रामीण	नागरी
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
1	गडचिरोली	2001	126	84	42	64	42	22	62	42	21
		1991	101	72	30	52	36	16	50	36	14
		1981	69	53	16	35	27	8	34	26	8
		1971	382	370	12	192	186	6	190	184	6
		1961	277	277	0	139	139	0	138	138	0
		1951	231	223	8	116	112	4	115	111	4
2	आरमोरी	2001	91	91	0	46	46	0	45	45	0
		1991	77	77	0	39	39	0	38	38	0
		1981	122	106	16	61	53	8	61	53	8
3	कुरखेडा	2001	78	78	0	40	40	0	38	38	0
		1991	62	62	0	31	31	0	30	30	0
		1981	73	73	0	37	37	0	36	36	0
4	धानोरा	2001	77	77	0	39	39	0	38	38	0
		1991	62	62	0	31	31	0	31	31	0
		1981	57	57	0	29	29	0	28	28	0
5	एटापल्ली	2001	71	71	0	36	36	0	35	35	0
		1991	54	54	0	27	27	0	27	27	0
		1981	60	60	0	31	31	0	29	29	0

तक्ता क्रमांक 1.2

1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्येचे आकडे हजारात)

अ. क्र.	तहसिल	वर्ष	एकूण व्यक्ती			पुरुष			स्त्रिया		
			एकूण	ग्रामीण	नागरी	एकूण	ग्रामीण	नागरी	एकूण	ग्रामीण	नागरी
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
6	सिरोंचा	2001	70	70	0	35	35	0	35	35	0
		1991	59	59	0	30	30	0	29	27	0
		1981	47	47	0	24	24	0	23	23	0
		1971	140	140	0	70	70	0	70	70	0
		1961	109	109	0	55	55	0	54	54	0
		1951	94	94	0	47	47	0	47	47	0
7	अहेरी	2001	104	104	0	52	52	0	51	51	0
		1991	79	60	19	40	30	10	39	29	9
		1981	72	72	0	37	37	0	35	35	0
8	चामोर्शी	2001	166	166	0	84	84	0	82	82	0
		1991	135	135	0	68	68	0	67	67	0
		1981	137	137	0	68	68	0	69	69	0
9	देसाईगंज	2001	76	51	35	39	26	13	37	25	12
		1991	64	44	20	32	22	10	32	22	10
		1981	0	0	0	0	0	0	0	0	0
10	कोरची	2001	41	41	0	20	20	0	20	20	0
		1991	35	35	0	17	17	0	18	18	0
		1981	0	0	0	0	0	0	0	0	0
11	भामरागड	2001	32	32	0	16	16	0	16	16	0
		1991	23	23	0	12	12	0	11	11	0
		1981	0	0	0	0	0	0	0	0	0

तक्ता क्रमांक 1.2

1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्येचे आकडे हजारात)

अ. क्र.	तहसिल	वर्ष	एकूण व्यक्ती			पुरुष			स्त्रिया		
			एकूण	ग्रामीण	नागरी	एकूण	ग्रामीण	नागरी	एकूण	ग्रामीण	नागरी
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
12	मुलचेरा	2001	40	40	0	20	20	0	19	19	0
		1991	35	35	0	18	18	0	18	18	0
		1981	0	0	0	0	0	0	0	0	0
	एकूण जिल्हा	2001	970	903	67	491	456	34	479	446	33
		1991	787	718	69	398	362	36	389	356	33
		1981	637	605	32	322	306	16	315	299	16
		1971	522	510	12	262	256	6	260	254	6
		1961	386	386	0	194	194	0	192	192	0
		1951	325	317	8	163	159	4	162	158	4

तक्ता क्रमांक 1.2

1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्येचे आकडे हजारात)

अ. क्र.	तहसिल	वर्ष	दर चौ. कि. मी. मधील लोकसंख्या	दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण	दर दशवार्षिक		
					एकूण	ग्रामीण	नागरी
1	2	3	13	14	15.00	16	17
1	गडचिरोली	2001	163	969	24.75	16.67	40
		1991	131	962	46.38	35.85	87.50
		1981	89	971	0.00	0	0
		1971	51	990	37.61	33.36	0
		1961	37	993	19.16	24.4	0
		1951	31	991	0.00	0.00	0.00
2	आरमोरी	2001	71	978	18.18	18.18	0.00
		1991	96	974	0.00	0.00	0.00
		1981	83	1000	0.00	0	0
3	कुरखेडा	2001	52	950	25.81	25.81	0.00
		1991	47	968	0.00	0.00	0.00
		1981	39	973	0.00	0	0
4	धानोरा	2001	40	974	24.19	24.19	0.00
		1991	33	1000	0.00	0.00	0.00
		1981	27	966	0.00	0	0
5	एटापल्ली	2001	18	999	31.48	31.48	0.00
		1991	17	1000	0.00	0.00	0.00
		1981	14	935	0.00	0	0

तक्ता क्रमांक 1.2

1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक

जिल्हा - गडचिरोली

(लोकसंख्येचे आकडे हजारात)

अ. क्र.	तहसिल	वर्ष	दर चौ. कि. मी. मधील लोकसंख्या	दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण	दर दशवार्षिक		
					एकूण	ग्रामीण	नागरी
1	2	3	13	14	15.00	16	17
6	सिरोंचा	2001	80	1000	18.64	18.64	0.00
		1991	68	967	25.53	25.53	0.00
		1981	55	958	0.00	0	0
		1971	17	1000	28.91	28.91	0
		1961	14	982	16.29	16.29	0
		1951	12	1000	0.00	0.00	0.00
7	अहेरी	2001	38	981	48.57	48.57	0.00
		1991	29	975	0.00	0.00	0.00
		1981	26	946	0.00	0	0
8	चामोर्शी	2001	162	976	22.96	22.96	0.00
		1991	143	985	0.00	0.00	0.00
		1981	116	1015	0.00	0	0
9	देसाईगंज	2001	396	949	18.75	15.91	17.00
		1991	0	1000	0.00	0.00	0.00
		1981	0	0	0.00	0	0
10	कोरची	2001	73	1000	17.14	17.14	0.00
		1991	0	1059	0.00	0.00	0.00
		1981	0	0	0.00	0	0
11	भामरागड	2001	70	1000	39.13	39.13	0.00
		1991	0	917	0.00	0.00	0.00
		1981	0	0	0.00	0	0

तक्ता क्रमांक 1.2

1951 पासूनच्या लोकसंख्येमधील दशवार्षिक फरक

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्येचे आकडे हजारात)

अ. क्र.	तहसिल	वर्ष	दर चौ. कि. मी. मधील लोकसंख्या	दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण	दरे दशवार्षिक		
					एकूण	ग्रामीण	नागरी
1	2	3	13	14	15.00	16	17
12	मुलचेरा	2001	242	950	14.29	14.29	0.00
		1991	0	1000	0.00	0.00	0.00
		1981	0	0	0.00	0	0
	एकूण जिल्हा	2001	63	976	23.25	25.77	2.90
		1991	51	977	23.55	18.68	115.63
		1981	41	978	22.03	15.7	116.67
		1971	34	992	35.23	30.12	0
		1961	25	990	18.76	18.76	0
		1951	21	994	0.00	0.00	0.00

टिप - 1) आकडे पुर्णांकात केल्याने बेरजा जुळणार नाही.

2) गडचिरोली व सिरोंचा तालुका वगळता इतर तालुक्यांची 1951 ,1961 व 1971 ची माहिती निरंक असल्यामुळे देण्यात आली नाही.

3) जनगणना 2001 ची आकडेवारी अस्थायी असून पुढील पडताळणीच्या आधिन आहे

आधार -- जनगणना 1951,1961,1971,1981,1991 (स्थाई आकडेवारी)

तक्ता क्र. 1.3

1991 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या गटानुसार गावांचे तालुकावार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्या शंभरात)

अ. क्र.	तहसील	वस्ती असलेली गांवे							
		200 पेक्षा कमी		200 ते 499		500 ते 999		1000 ते 1999	
		संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या
1	2	3	4	5	6	7	8	9	10
1	गडचिरोली	35	35	21	68	20	165	25	342
2	आरमोरी	16	18	29	85	21	127	16	203
3	कुरखेडा	27	46	37	130	30	202	13	160
4	धानोरा	120	118	69	244	19	113	7	104
5	एटापल्ली	99	105	70	181	13	111	7	98
6	सिरोंचा	39	38	43	152	20	137	7	80
7	अहेरी	56	61	57	183	21	135	13	170
8	चामोर्शी	34	37	48	169	56	409	25	319
9	देसाईगंज	2	2	5	18	7	50	8	109
10	कोरची	82	84	39	119	18	128	1	18
11	भामरागड	71	57	31	90	6	42	3	43
12	मुलचेरा	17	18	28	99	27	185	4	48
एकूण जिल्हा		598	619	477	1538	258	1804	129	1694

तक्ता क्र. 1.3

1991 च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या गटानुसार गावांचे तालुकावार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्या शंभरात)

अ. क्र.	तहसील	वस्ती असलेली गांवे								
		2000ते 4999		5000 ते 9999		10000 व अधिक		एकूण		
		संख्या	लोक-संख्या	संख्या	लोक-संख्या	संख्या	लोक-संख्या	संख्या	लोकसंख्या	ओसाड गांवे संख्या
1	2	11	12	13	14	15	16	17	18	19
1	गडचिरोली	4	109	0	0	0	0	105	719	16
2	आरमोरी	5	137	1	50	1	153	88	773	12
3	कुरखेडा	1	29	1	53	0	0	109	620	8
4	धानोरा	1	44	0	0	0	0	216	623	11
5	एटापल्ली	1	45	0	0	0	0	190	540	7
6	सिरोंचा	4	128	1	54	0	0	114	589	34
7	अहेरी	2	49	0	0	0	0	149	598	26
8	चामोर्शी	10	257	1	57	1	102	175	1350	22
9	देसाईगंज	7	212	1	50	0	0	30	441	6
10	कोरची	0	0	0	0	0	0	140	349	7
11	भामरागड	0	0	0	0	0	0	111	232	17
12	मुलचेरा	0	0	0	0	0	0	76	350	2
एकूण जिल्हा		35	1010	4	264	2	255	1503	7184	168

टीप :- आकडे पूर्णांकात केल्याने बेरजा जुळणार नाही.

2) सदर तक्त्यातील माहीती केवळ अस्थायी व पूढील पडताळणीच्या अधिन राहून तयार केलेली आहे

आधार - जनगणना 1991

तक्ता क्र. 1.4

2001 च्या जनगणने प्रमाणे लोकसंख्या गटानुसार शहरांचे तालुकावार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्या हजारात)

अ. क्र.	तहसील	लोकसंख्येप्रमाणे शहरांची संख्या							
		5000 पेक्षा कमी		5000 ते 9999		10000 ते 19999		20000 ते 49999	
		संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या
1	2	3	4	5	6	7	8	9	10
1	गडचिरोली	0	0	0	0	0	0	1	42
2	आरमोरी	0	0	0	0	0	0	0	0
3	कुरखेडा	0	0	0	0	0	0	0	0
4	धानोरा	0	0	0	0	0	0	0	0
5	एटापल्ली	0	0	0	0	0	0	0	0
6	सिरोंचा	0	0	0	0	0	0	0	0
7	अहेरी	0	0	0	0	0	0	0	0
8	चामोर्शी	0	0	0	0	0	0	0	0
9	देसाईगंज	0	0	0	0	0	0	1	25
10	कोरची	0	0	0	0	0	0	0	0
11	भामरागड	0	0	0	0	0	0	0	0
12	मुलचेरा	0	0	0	0	0	0	0	0
जिल्हा एकूण		0	0	0	0	0	0	2	67

तक्ता क्र. 1.4

2001 च्या जनगणने प्रमाणे लोकसंख्या गटानुसार शहरांचे तालुकावार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (लोकसंख्या हजारात)

अ. क्र.	तहसील	लोकसंख्येप्रमाणे शहरांची संख्या					
		50000 ते 99999		100000 व अधिक		एकूण शहरे	
		संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या	संख्या	लोकसंख्या
1	2	11	12	13	14	15	16
1	गडचिरोली	0	0	0	0	1	42
2	आरमोरी	0	0	0	0	0	0
3	कुरखेडा	0	0	0	0	0	0
4	धानोरा	0	0	0	0	0	0
5	एटापल्ली	0	0	0	0	0	0
6	सिरोंचा	0	0	0	0	0	0
7	अहेरी	0	0	0	0	0	0
8	चामोर्शी	0	0	0	0	0	0
9	देसाईगंज	0	0	0	0	1	25
10	कोरची	0	0	0	0	0	0
11	भामरागड	0	0	0	0	0	0
12	मुलचेरा	0	0	0	0	0	0
जिल्हा एकूण		0	0	0	0	2	67

टिप - जनगणना 2001 ची आकडेवारी अस्थाई असून पुढील पडताळणीच्या आधिन आहे .

आधार -- 2001 जनगणना प्रकाशन.(अस्थाई)

तक्ता क्र. 1.5(अ)

1991 च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणा-यांची संख्या

जिल्हा -गडचिरोली. (आकडे शंभरात)

अ. क्र.	तहसील	बाब	काम करणा-यांचा वर्ग						
			शेतकरी	शेतमजूर	पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छीमारी, शिकारी, फळबाग, मळे इ.	खाणकाम व दगड खाणकाम करणारे	वस्तु निर्माण प्रक्रिया सेवा व दुरुस्त्या इ. घरगुती उद्योगात काम करणारे	घरगुती उद्योगा व्यतिरिक्त इतर उद्योग	बांध-काम करणारे
1	2	3	4	5	6	7	8	9	10
1	गडचिरोली	ग्रामीण	164	109	5	1	3	5	3
		नागरी	13	25	5	0	3	4	5
		एकूण	177	134	10	1	5	9	8
2	आरमोरी	ग्रामीण	170	146	8	3	3	8	2
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	170	146	8	3	3	8	2
3	कुरखेडा	ग्रामीण	185	79	3	0	5	3	2
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	185	79	3	0	5	3	2
4	धानोरा	ग्रामीण	200	67	3	0	3	2	1
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	200	67	3	0	3	2	1
5	एटापल्ली	ग्रामीण	197	33	2	0	1	3	1
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	197	33	2	0	1	3	1
6	सिरोंचा	ग्रामीण	114	124	7	0	5	5	2
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	114	124	7	0	5	5	2
7	अहेरी	ग्रामीण	171	68	12	0	1	6	4
		नागरी	5	6	11	0	1	3	4
		एकूण	176	74	22	0	2	10	7
8	चामोर्शी	ग्रामीण	362	184	14	1	14	9	8
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	362	184	14	1	14	9	8

तक्ता क्र. 1.5(अ)

1991 च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणा-यांची संख्या

जिल्हा -गडचिरोली (आकडे शंभरात)

अ. क्र.	तहसील	बाब	काम करणा-यांचा वर्ग						
			शेतकरी	शेतमजूर	पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छीमारी, शिकारी, फळबाग, मळे इ.	खाणकाम व दगड खाणकाम करणारे	वस्तु निर्माण प्रक्रिया सेवा व दुरुस्त्या इ. घरगुती उद्योगात काम करणारे	घरगुती उद्योगा व्यतिरिक्त इतर उद्योग	बांध-काम करणारे
1	2	3	4	5	6	7	8	9	10
9	देसाइगंज	ग्रामीण	109	90	3	0	2	3	1
		नागरी	13	26	2	0	3	6	2
		एकूण	122	116	6	0	5	8	3
10	कोरची	ग्रामीण	123	35	1	0	2	1	0
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	123	35	1	0	2	1	0
11	भामरागड	ग्रामीण	98	16	1	0	1	1	0
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	98	16	1	0	1	1	0
12	मुलचेरा	ग्रामीण	86	23	3	0	3	1	1
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	86	23	3	0	3	1	1
जिल्हा एकूण		ग्रामीण	1981	974	64	5	42	47	25
		नागरी	31	57	18	1	7	13	10
		एकूण	2012	1031	82	6	49	60	36

तक्ता क्र. 1.5(अ)

1991 च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणा-यांची संख्या

जिल्हा :गडचिरोली (आकडे हजारात)

अ. क्र.	तहसील	बाब	काम करणा-यांचा वर्ग						
			व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात काम करणारे	वाहतूक साठवण आणि दळण-वळण	इतर काम करणारे	एकूण मुख्यतः काम करणारे (4 ते 13 ची बेरीज)	सिमांतिक काम करणारे	एकूण काम न करणारे	एकूण लोकसंख्या (14 ते 16 ची बेरीज)
1	2	3	11	12	13	14	15	16	17
1	गडचिरोली	ग्रामीण	4	2	15	310	89	320	719
		नागरी	11	4	31	101	3	191	296
		एकूण	16	6	46	411	92	511	1014
2	आरमोरी	ग्रामीण	8	1	21	371	43	361	774
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	8	1	21	371	43	361	774
3	कुरखेडा	ग्रामीण	5	1	16	298	38	282	618
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	5	1	16	298	38	282	618
4	धानोरा	ग्रामीण	4	1	15	296	59	266	621
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	4	1	15	296	59	266	621
5	एटापल्ली	ग्रामीण	3	1	12	254	62	225	541
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	3	1	12	254	62	225	541
6	सिरोंचा	ग्रामीण	3	1	18	280	56	253	589
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	3	1	18	280	56	253	589
7	अहेरी	ग्रामीण	3	1	12	277	63	259	598
		नागरी	6	2	19	56	9	127	192
		एकूण	8	3	30	333	71	386	790
8	चामोर्शी	ग्रामीण	9	2	30	634	101	611	1347
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	9	2	30	634	101	611	1347

तक्ता क्र. 1.5(अ)

1991 च्या जनगणनेनुसार काम करणारे व काम न करणा-यांची संख्या

जिल्हा -गडचिरोली (आकडे हजारात)

अ. क्र.	तहसील	बाब	काम करणा-यांचा वर्ग						
			व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात काम करणारे	वाहतूक साठवण आणि दळण-वळण	इतर काम करणारे	एकूण मुख्यतः काम करणारे (8 ते 13 ची बेरीज)	सिमांतिक काम करणारे	एकूण काम न करणारे	एकूण लोकसंख्या (14 ते 16 ची बेरीज)
1	2	3	11	12	13	14	15	16	17
9	देसाइगंज	ग्रामीण	2	1	8	218	21	202	442
		नागरी	9	2	9	73	4	121	198
		एकूण	11	3	16	292	25	323	640
10	कोरची	ग्रामीण	2	0	6	170	23	146	349
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	2	0	6	170	23	146	349
11	भामरागड	ग्रामीण	1	0	5	123	17	93	233
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	1	0	5	123	17	93	233
12	मुलचेरा	ग्रामीण	2	1	5	125	51	178	355
		नागरी	0	0	0	0	0	0	0
		एकूण	2	1	5	125	51	178	355
जिल्हा एकूण		ग्रामीण	46	10	160	3355	633	3197	7184
		नागरी	26	8	59	231	16	439	686
		एकूण	72	19	219	3586	649	3636	7870

आधार -- 1991 जनगणना प्रकाशन.

टिप - आकडे पुर्णांकात दिल्याने बेरजा जुळणार नाही.

तक्ता क्रमांक - 1.5(ब)

1991 च्या जनगणनेनुसार मुख्यतः काम करणा-या व्यक्तींची उद्योगगट क्षेत्रनिहाय विभागणी.

जिल्हा :- गडचिरोली (आकडे हजारात)

बाब	प्राथमिक क्षेत्र			द्वितीय क्षेत्र		
	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण
1	2	3	4	5	6	7
ग्रामीण	173 (86)	129 (96)	302 (90)	9 (5)	2 (2)	11 (3)
नागरी	6 (37)	5 (74)	11 (46)	3 (16)	0 (6)	3 (13)
एकूण	179 (83)	134 (95)	313 (87)	12 (6)	2 (2)	15 (4)

तक्ता क्रमांक - 1.5(ब) (पुढे चालू. . .)

1991 च्या जनगणनेनुसार मुख्यतः काम करणा-या व्यक्तींची उद्योगगट क्षेत्रनिहाय विभागणी.

बाब	तृतीय क्षेत्र			एकूण		
	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण
1	8	9	10	11	12	13
ग्रामीण	18 (9)	4 (3)	22 (6)	200 (100.00)	135 (100.00)	336 (100.00)
नागरी	8 (48)	1 (20)	9 (40)	17 (100.00)	6 (100.00)	23 (100.00)
एकूण	26 (12)	5 (4)	31 (9)	217 (100.00)	141 (100.00)	359 (100.00)

टिप - कंसातील आकडे काम करणा-या एकूण व्यक्तींशी (पुरुष/ स्त्रिया/ एकूण) टक्केवारी दर्शवितात .

आधार : जनगणना प्रकाशन - 1991

तक्ता क्रमांक - 1.6 (अ)

लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (आकडे शंभरात)

बाब	सर्व वयोगट	0-14	15-19	20-24	25-29
1	2	3	4	5	6
एकूण	20556	8146	1783	1659	1574
ग्रामिण	17939	7122	1523	1410	1342
नागरी	2617	1024	260	249	232

तक्ता क्रमांक - 1.6 (अ) (पुढे चालू . .)

लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (आकडे शंभरात)

बाब	30-34	35 - 39	40 - 49	50 - 59	60 व त्यावरील	वय अनिर्देशित
1	7	8	9	10	11	12
एकूण	1338	1293	2076	1315	1234	37
ग्रामिण	1158	1129	1845	1177	1200	32
नागरी	180	164	231	138	134	5

आधार :- 1981 ची जनगणना

टिप :- नवनिर्मित गडचिरोली जिल्हयाची उपरोक्त माहीती उपलब्ध नसल्यामुळे अविभक्त चंद्रपूर जिल्हयाची माहीती दिली आहे.

तक्ता क्रमांक - 1.6 (ब)

लोकसंख्येचे धर्मानुसार वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली (आकडे शंभरात)

बाब	सर्व धर्म	बौध्द	ख्रिश्चन	हिंदू	जैन	मुस्लीम	शीख	इतर	धर्म अनिर्देशित
1	2	3	4	5	6	7	8	9	10
				1. पुरूष					
एकूण	3984	324	8	3567	1	69	1	2	11
ग्रामिण	3625	283	7	3286	1	37	1	2	10
नागरी	359	41	1	281	1	33	1	1	1
				2. स्त्रिया					
एकूण	3886	316	8	3481	1	62	1	2	12
ग्रामिण	3560	279	7	3226	1	35	0	2	11
नागरी	327	37	1	256	0	30	1	0	1
एकूण	7870	640	15	7048	2	135	2	5	23
ग्रामिण	7184	561	13	6512	1	72	1	4	21
नागरी	686	79	2	537	1	63	1	1	2

टिप :- आकडे पूर्णांकित केल्याने बेरजा जुळणार नाही.

आधार :- 1991 ची जनगणना

तक्ता क्रमांक - 1.7

1991 च्या जनगणनेनुसार अनुसुचित जाती व जमातीची आकडेवारी

जिल्हा - गडचिरोली (आकडे हजारात)

अ. क्र.	तहसील	बाब	अनुसुचित जाती			अनुसुचित जमाती			एकूण		
			व्यक्ती	पुरुष	स्त्रिया	व्यक्ती	पुरुष	स्त्रिया	व्यक्ती	पुरुष	स्त्रिया
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
1	गडचिरोली	एकूण	15	7	7	19	10	9	34	17	16
		ग्रामीण	10	5	5	15	8	8	25	13	13
		नागरी	5	2	2	4	2	2	9	4	4
2	आरमोरी	एकूण	10	5	5	20	10	10	30	15	15
		ग्रामीण	10	5	5	20	10	10	30	15	15
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
3	कुरखेडा	एकूण	7	4	4	32	16	16	39	20	20
		ग्रामीण	7	4	4	32	16	16	39	20	20
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
4	धानोरा	एकूण	3	2	2	45	22	22	48	24	24
		ग्रामीण	3	2	2	45	22	22	48	24	24
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
5	एटापल्ली	एकूण	2	1	1	43	22	22	45	23	23
		ग्रामीण	2	1	1	43	22	22	45	23	23
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
6	सिरोंचा	एकूण	14	7	7	14	7	7	28	14	14
		ग्रामीण	14	7	7	14	7	7	28	14	14
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
7	अहेरी	एकूण	12	6	6	38	19	19	50	25	25
		ग्रामीण	10	5	5	33	17	17	43	22	22
		नागरी	2	1	1	5	2	2	7	4	3
8	चामोर्शी	एकूण	15	7	7	26	13	13	41	20	20
		ग्रामीण	15	7	7	26	13	13	41	20	20
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
9	देसाईगंज	एकूण	12	6	6	9	5	5	21	11	11
		ग्रामीण	8	4	4	8	4	4	16	8	8
		नागरी	4	2	2	1	1	1	5	3	3

तक्ता क्रमांक - 1.7

1991 च्या जनगणेनेनुसार अनुसुचित जाती व जमातीची आकडेवारी

जिल्हा - गडचिरोली (आकडे हजारात)

अ. क्र.	तहसील	बाब	अनुसुचित जाती			अनुसुचित जमाती			एकूण		
			व्यक्ती	पुरुष	स्त्रिया	व्यक्ती	पुरुष	स्त्रिया	व्यक्ती	पुरुष	स्त्रिया
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
10	कोरची	एकूण	3	1	1	27	13	14	30	14	15
		ग्रामीण	3	1	1	27	13	14	30	14	15
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
11	धानोरा	एकूण	1	0	0	19	10	10	20	10	10
		ग्रामीण	1	0	0	19	10	10	20	10	10
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
12	मुलचेरा	एकूण	2	1	1	11	5	5	13	6	6
		ग्रामीण	2	1	1	11	5	5	13	6	6
		नागरी	0	0	0	0	0	0	0	0	0
जिल्हा एकूण		एकूण	96	49	47	305	153	153	401	202	199
		ग्रामीण	85	43	42	294	148	147	379	191	189
		नागरी	11	6	5	10	5	5	21	11	10

टिप - 1) आकडे पुर्णांकित केल्याने बेरजा जुळणार नाही.

2)अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमध्ये नवबौध्दांची लोकसंख्या समाविष्टआहे.

3) तक्त्यातील माहीती केवळ अस्थायी व पूढील पडताळणीचे अधिन राहून तयार केली आहे.

आधार -- 1991 ची जनगणना.

तक्ता क्रमांक - 1.8

भिंती/ छप्परे यासाठी वापरलेल्या साधन सामुग्री नुसार घरांचे वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली

अ.क्र.	बाब	एकूण संख्या	ग्रामीण संख्या	नागरी संख्या
1	2	3	4	5
एकूण जनगणना घरे				
एक	**भिंतीसाठी वापरलेली सामुग्री**			
1	गवत, पाने, वेळू व बांबू	67935	65865	2070
2	माती	94785	91515	3270
3	कच्च्या विटा	5545	4780	765
4	लाकूड	12830	12500	330
5	पक्क्या विटा	41170	29050	12120
6	गॅल्वनाईज्ड लोखंडी किंवा इतर धातूचे पत्रे	265	230	35
7	दगड	260	260	0
8	सिमेंट कॉक्रीट	1345	1130	215
9	वर उल्लेखलेल्या व्यतिरिक्त वापरलेली इतर सामुग्री	6815	6615	200
दोन	**छपरांसाठी वापरलेली सामुग्री**			
1	गवत,पाने,वेळू ,माती,कच्च्या विटा किंवा बांबू	65945	65110	835
2	कौले, तक्ती दगड, कंकर	126540	113310	13230
3	पन्हाळीचे लोखंडी पत्रे, जस्ताचे किंवा धातूचे पत्रे	1810	1390	420
4	ॲस्बेस्टॉस सिमेंटचे पत्रे	920	690	230
5	विटा व चुना	1140	635	505
6	दगड	70	65	5
7	प्रचलित सिमेंट कॉक्रीट	4335	2240	2095
8	इतर वर उल्लेखलेल्या व्यतिरिक्त वापरलेली सामुग्री	30190	28505	1685

आधार :-1991 ची जनगणना प्रकशसन(एच 2 भाग ब)घरबांधणी अहवाल.(अस्थाई आकडेवारी)

तक्ता क्रमांक - 1.9

आकार व मालकीच्या स्थितीनुसार ग्रामिण/ नागरी क्षेत्रातील कुटुंबाचे वर्गीकरण

जिल्हा - गडचिरोली

अ.क्र.	बाब	ग्रामीण संख्या	नागरी संख्या	एकूण संख्या
1	2	3	4	5
1	एक) एकूण कुटुंबे	140605	14620	155225
	दोन) घराच्या मालकी बाबतची स्थिती			
	अ) स्वत:ची घरे असलेली	127985	8615	136600
	ब) भाड्याच्या घरात राहणारी	9750	5640	15390
	क) बेघर कुटुंबे	-	-	-
	ड) इतर	2870	365	3235
2	एक ते दोन व्यक्ती असलेली कुटुंबे			
	एक) एकूण कुटुंबे	19585	2795	22380
	दोन) घराच्या मालकी बाबतची स्थिती			
	अ) स्वत:ची घरे असलेली	14870	1180	16050
	ब) भाडयाच्या घरात राहणारी	3925	1545	5470
	क) बेघर कुटुंबे	-	-	-
	ड) इतर	790	70	860
3	तीन ते पाच व्यक्ती असलेली कुटुंबे			
	एक) एकूण कुटुंबे	73110	7530	80640
	दोन) घराच्या मालकी बाबतची स्थिती			
	अ) स्वत:ची घरे असलेली	66980	4295	71275
	ब) भाडयाच्या घरात राहणारी	4470	3040	7510
	क) बेघर कुटुंबे	-	-	-
	ड) इतर	1660	195	1855
4	सहा ते आठ पाच व्यक्ती असलेली कुटुंबे			
	एक) एकूण कुटुंबे	39045	3595	42640
	दोन) घराच्या मालकी बाबतची स्थिती			
	अ) स्वत:ची घरे असलेली	37425	2535	39960
	ब) भाडयाच्या घरात राहणारी	1245	985	2230
	क) बेघर कुटुंबे	-	-	-
	ड) इतर	375	75	450
5	नऊ व अधिक व्यक्ती असलेली कुटुंबे			
	एक) एकूण कुटुंबे	8865	700	9565
	दोन) घराच्या मालकी बाबतची स्थिती			
	अ) स्वत:ची घरे असलेली	8710	605	9315
	ब) भाडयाच्या घरात राहणारी	110	70	180
	क) बेघर कुटुंबे	-	-	-
	ड) इतर	45	25	70

आधार :- जनगणना प्रकाशन 1991(एच 2 भाग ब)घरबांधणी अहवाल.(अस्थाई आकडेवारी)

तक्ता क्रमांक - 1.10

जनगणना घरे आणि त्यांचा वापर

जिल्हा -गडचिरोली

अ.क्र.	बाब	एकूण जनगणना घरे	जनगणनेच्या सुरुवातीची रिकामी असलेली घरे	जनगणना घरांचा वापर			इतर वापरासह स्तंभ 6 व 7 मध्ये निर्देशित केलेल्या व्यतिरिक्त रहाणे	हॉटेल, धर्मशाळा, पर्यटन-घरे, इत्यादी
				रहाणे	दुकान आणि रहाणे	यंत्रशाळा (कुटीर-उद्योगासह) आणि रहाणे		
1	2	3	4	5	6	7	8	9
1	एकूण	230950	9265	145020	1930	4285	3110	315
2	ग्रामीण	211945	7770	131035	1785	3935	3005	260
3	नागरी	19005	1495	13985	145	350	105	55

तक्ता क्रमांक - 1.10 (पुढे चालू . . .)

जनगणना घरे आणि त्यांचा वापर

जिल्हा - गडचिरोली

अ.क्र.	बाब	उपहार गृहे सोडून दुकाने	व्यवसायांची घरे आणि कार्यालये	कारखाने, यंत्रशाळा, छपरे इत्यादी	रेस्टॉरंट, मिठाईची दुकाने, आणि उपहारगृहे	करमणूक पंचायत घरे सांस्कृतिक केंद्र इ. पुजा स्थाने सोडून	पुजास्थान (देवळे, चर्च, मशिद, गुरुव्दारा) वगैरे	इतर
1	2	10	11	12	13	14	15	16
1	एकूण	1940	1305	1980	220	325	1835	59420
2	ग्रामीण	1445	955	1525	170	290	1740	58030
3	नागरी	495	350	455	50	35	95	1390

आधार :- जनगणना प्रकाशन 1991(एच 2 भाग ब) घर बांधणी अहवाल.(अस्थाई आकडेवारी)

तक्ता क्र. 1.11

क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न

चालु किंमतीनुसार

जिल्हा - गडचिरोली (रुपये हजारात)

अ.क्र.	क्षेत्र	वर्ष - 1999-2000 *		वर्ष - 2000-2001@	
		स्थूल जिल्हा उत्पन्न	निव्वळ जिल्हा उत्पन्न	स्थूल जिल्हा उत्पन्न	निव्वळ जिल्हा उत्पन्न
1	कृषि	2014647	1917967	1051569	1001106
2	वन संवर्धन आणि ओंडके पाडणे	3373977	3311449	2948383	2893746
3	मासेमारी	66687	53692	61766	49730
4	खाण व दगड खाणकाम	14335	11135	14297	11105
	एकूण - प्राथामिक क्षेत्र (अ)	5469647	5294243	4076015	3955686
5	नोंदणीकृत उद्योग	159556	126013	175225	138388
6	अनोंदणीकृत उद्योग	555410	446476	725785	583434
7	बांधकाम	576452	553133	636752	610993
8	वीज, वायु (गॅस) व पाणीपुरवठा	366649	244302	166087	110666
	एकूण - द्वितीय क्षेत्र (ब)	1658068	1369923	1703848	1443481
9	रेल्वे	2421	1875	2569	1984
10	परिवहन, साठवणूक व गोदामे	119693	92981	119121	92536
11	दळणवळण	239868	200076	282980	236036
12	व्यापार,हॉटेल्स व उपहारगृहे	886352	860784	1015764	986464
13	बँका व विमा उद्योग	620825	583451	688679	643580
14	स्थावर मालमत्ता , राहत्या घराची मालकी व व्यावसाय सेवा	1026792	872849	1083430	920995
15	सार्वजनिक प्रशासन	934452	807850	920361	795669
16	इतर सेवा	1226205	1176656	1324366	1270851
	एकूण - तृतीय क्षेत्र (क)	5056608	4596523	5437270	4948114
	एकूण जिल्हा उत्पन्न (अ+ब+क)	12184322	11260689	11217133	10347281
	दरडोई जिल्हा उत्पन्न (रूपये)	12894	11916	11650	10746
	एकूण राज्य उत्पन्न	2414103618	2131510848	2582718737	2278933831
	दरडोई राज्य उत्पन्न (रूपये)	25601	22604	26888	23726
	एकूण जिल्हा उत्पन्नाची एकूण राज्य उत्पन्नाशी टक्केवारी	0.5	0.53	0.43	0.45

* - अस्थायी @ - प्रारंभिक

आधार :- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, (राष्ट्रीय उत्पन्न शाखा) मुंबई

टिप :- अंदाज अस्थायी स्वरुपाचे आहेत.

तक्ता क्र. 1.12

क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न

स्थिर (1993-94) किंमतीनुसार

जिल्हा - गडचिरोली (रुपये हजारात)

अ.क्र.	क्षेत्र	वर्ष - 1999-2000*		वर्ष - 2000-2001@	
		स्थूल जिल्हा उत्पन्न	निव्वळ जिल्हा उत्पन्न	स्थूल जिल्हा उत्पन्न	निव्वळ जिल्हा उत्पन्न
